# प्रकरण चौथे

## शाहीर परशरामांच्या लावण्यांचे वर्गीकरण

## प्रकरण चौथे

## शाहीर परशरामांच्या लावण्याचे वर्गीकरण

मराठी शाहिरी वाङ्मयामध्ये इतर शाहिरांच्यापेक्षा वेगळे व्यक्तिमत्व असणारा शाहीर म्हणजे परशराम होय. त्यांच्या लावण्यांचा अभ्यास करताना स्थुलमानाने सहा विभाग पाडता येतील. या सहा विभागातुन परशरामानी त्या काळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक परिस्थितीची माहिती दिलेली आहे. या परिस्थितीबरोबरच त्या काळातील स्त्री पुरुषाच्या लौकिक स्वरुपाचा शृंगार ही पाहावयास मिळतो. परशरामाच्या लावण्यांची संख्या जवळ जवळ एकशेसाठी भरते. त्यानी काही पोवाडे ही रेखाटले आहेत. ते केवळ आठ-दहाच भरतील. पेशवाईचा अस्त झाल्यावर इंग्रजी सत्ता भारतावर राज्य करु लागली. या समाजक्रांतीचे चित्रण "देशास्थितीचा पोवाडा" या पोवाड्यात केले आहे. त्यांच्या सामाजिक लावण्या बरोबरच त्या काळातील शृंगार आध्यात्मिक, भक्तीवर्णनपर विषय आपल्यालावण्यातुन चित्रित केले आहेत. लावणीची रचना ही आर्थिकदृष्टया विपन्न अशा धर्मभ्रांतीच्या काळात महाराष्ट्रीय समाजाच्या अवनत परिस्थितीत केवळ सामान्य जनाच्या रंजनासाठी लिहिली गेली. लोकसमुहासमोर म्हणून दाखवण्यासाठी रचलेल्या कवनात साहजिकच तालबध्द रचना हा आवश्यक भाग होऊन बसला त्यासाठी कडे व टोलके इत्यादी साधनाचा वापर केला अशी विविधता असणा-या शाहीर परशरामांच्या लावण्यांचा शोध घ्यावयाचा आहे.

मराठी शाहिरानी आपल्या लावण्याची रचना करताना लोकजीवनातील असंख्य विषय निवडले आहेत. त्यात लौकिक भाव-भावनांची सुंदर चित्रे रेखाटली आहेत. यामध्ये रामजोशी, होनाजीबाळा, प्रभाकर, सगनभाऊ या प्रसिध्द

शाहिरांच्या लावण्यामधून शृंगार, सामाजिकता, उपदेशपर, नितीपर, स्फुट विषयावरील लावण्या, देवदेवते व तीर्थे यांच्या वर्णनपर लावण्या, या सर्व लावण्यांनी महाराष्ट्राला मोहित केले आहे. या सर्व शाहिरांच्या- पेक्षा वेगळा असा ठसा उमटविणारा शाहीर म्हणजे परशराम होय. शाहीर परशरामाची वरील शाहिरांच्यापेक्षा वेगळीक दिसते. ती वेगळीक म्हणजे परमेश्वर प्राप्तीसाठी परमेश्वराची आळवणी ही करतो व आपली उपजिवीका भागवण्यासाठी तमाशाचे फडही करतो. त्यामुळे परशरामाच्या व्यक्तिमत्वातून संत व शाहीर हे दोन पैलू दिसतात. शाहीर परशरामाच्या वेगळीकी बद्दल प्रसिध्द समीक्षक रा.श्री. जोग आपल्या ग्रंथात म्हणतात, "परशरामाने काही शुध्द नैतिक बोध करणाऱ्या, काही पौराणिक कथा सांगणाऱ्या, काही वैराग्यपर अशाही लावण्या लिहिल्या आहेत. परंतु समकालीन समाजाला हे नको असून दुसरेच काही पाहिजे असते. हे त्यालाही उमलले असावे म्हणून त्यानेही इतराप्रमाणे शृंगारपर रचना करुन ठेवली आहे. आणि इतरांच्या पंक्तीत स्वतःस बसवून घेतले आहे. परंतु त्यामुळे "इदंच नास्ति परं च न लभ्यते" म्हणजे धड संत नव्हे धड शाहिरही नाही अशी परशरामाची द्विधा स्थिती झाली आहे." [१]

शाहीर परशरामांच्या लावण्यांमधून त्यांच्या विविध गुणांची ओळख करुन घ्यावयाची आहे. शाहीर परशरामांच्या विविध लावण्यांचा अभ्यासाचे वर्गीकरण करताना आपल्याला डॉ. गंगाधर मोरजे यांनी संपादित केलेल्या "शाहीर वरदी परशराम" या पुस्तकातील लावण्या विचारात घेतल्या आहेत. परशरामांच्या लावण्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल.

१) शृंगारिक लावण्या

२) आध्यात्मिक लावण्या

३) सामाजिक लावण्या

४) पौराणिक लावण्या

५) ईश्वरवर्णनपर लावण्या

६) इतर लावण्या.

## शृंगारिक लावण्या :

मराठी शाहिरी वाङ्मयातील सर्वच शाहिरांच्या लावण्यात शृंगार पाहावयास मिळतो. शाहिरांच्या शृंगारिक लावण्यातून अनेक गोष्टींची प्रचीती आपल्याला येते. मानवी मनाचे विशेषतः स्त्री पुरुषाच्या तरुण मनाच्या विविध विलासयुक्त अवस्था शाहिरानी लावण्यातून चित्रित केल्या आहेत.

शाहीर परशराम साध्या भोळ्या गावक-यात राहिले. त्यांचे आचार विचार त्यांची राहणी आणि त्यांचा जीवनक्रम यांचे वर्णन करुन सामान्य जनतेचे रंजन करण्यातच त्याने समाधान मानले. साध्या भोळ्या लोकांचे समाधान करीत असताना परशरामाने काही शृंगारिक लावण्या लिहिल्या आहेत. हा शृंगार रेखाटत असताना शाहीर परशराम रामजोशी, होनाजीबाळा, प्रभाकर यांच्या सारखा अश्लीलतेकडे जास्त प्रमाणात झुकत नाही हे त्यांच्या अनेक लावण्यावरुन कळते.

परशरामानी ज्या लावण्या लिहिल्या आहेत त्या लावणीमध्ये स्त्री पुरुष संबंधाची अनेक चित्रे रेखाटली आहेत. या शृंगारिक लावण्यामध्ये पति-पत्नीच्या शृंगार प्रियकर प्रेयशीचा शृंगार सुबकपणे परशरामाने मांडला. स्त्री पुरुष जीवनातील विविध सोहळ्याची वर्णने परशरामानी चित्रित केली आहेत. ही चित्रणे रेखाटत असताना शाहिरानी बराच धीटपणा दाखवला आहे.

शाहीर परशरामानी आपल्या लावण्यामध्ये तारुण्याने मुसमुसलेली युवक-युवती चित्रित केली आहेत. पती पत्नीचे मिलन पतीवर असणारे पत्निचे

सात्विक प्रेम, युध्दावर जाणा-या शिपाईगड्याचा विरह, निपुत्रीक स्त्रीची दु:खे, गर्भवती स्त्रीची आनंदी अवस्था, दोन बायकांनी केलेली नव-याची फजिती, पतीविरहाने झुरुन झुरुन क्षीणकाय झालेल्या नायिकेचे वर्णन, सवतीची भांडणे, व्याभिचारी प्रणय, इत्यादी संसारिक गोष्टीची चित्रणे शाहीर परशरामानी आपल्या शृंगारिक लावण्यात रेखाटली आहेत.

स्त्री सौंदर्याचे विविध अंगानी परशराम वर्णन करतात. पायात पैंजण घातलेल्या हळदीचे सुख माखलेल्या भरजरी हिरव्या पातळात शोभिवंत असलेल्या मोत्याच्या झालरीत चौरंगावर स्नानासाठी बसलेल्या सह्याच्या झोळक्यातील नखरेल नव युवतीचे वर्णन खास महाराष्ट्रीय ढंगात परशराम करतात -

"वय बारा तेरांत ऐन आली भरांत भुईंग ठेंगणी ।
दंडी बाजुबंद बाहुटया सरपळुच्या हिरे जडले कंगणी ।
गगनांत चांदणी ठळक मारशी झळक उभी ग अंगणी ।
किती नटून थटून मारशील झाकझ नैनाच्या संगीणी ।

(टुमदार कोणाची छान । नवती भरज्वान,
पा.नं १५७)

असेच एका तारुण्याने मुसमुसलेल्या चार चौघीत ढहून दिसणा-या नखरेल तारकांचे वर्णन परशराम उत्कृष्ट पध्दतीने करतात,

"चौभंवताल्या उभ्या बायका। त्यांत नारी तूं जल भरशी।
नक्षत्रि तारका सरशी ।। धृ.।।
पदर जरीचा घाटा घेऊन कर्दळी लवली जशी ।
पोल नि-या जपूर धरशी ।

टळक हाती चुडे झाळाळी दागिन्यांत घवघवशी ।
अपरंभा केवळ हवशी ।

(चौभंवताल्या उभ्या बायका, पृ.१९३)

शाहीर परशराम आपल्या शृंगारिक लावण्यामध्ये वयात आलेल्या स्त्रीपासून ते लग्न झालेल्या स्त्रियांची चित्रे रेखाटली आहेत. अशीच एक नुकतीच वयात आलेली युवती परशरामानी रेखाटली आहे. ही युवती आपल्या सौंदर्याने परपुरुषाला आकर्षित करण्यासाठी तिने जो शृंगार केला आहे तो शृंगारसाज एका लावणीत परशराम रेखाटतात, त्या युवतीचे टुमदार चालणे तिच्या शालूचा रंग, पिवळा, हिरवा, पायामध्ये चिमणीच्या आवाजाप्रमाणे वाजणारे वाळे, डोळ्यात काजळ, हातात चुडा, इत्यादी गोष्टींचा साज शृंगार त्या युवतीने केला आहे व ही युवती युवकाना भूरळ घालत आहे. या सर्व गोष्टीचे वर्णन ठसकदार पध्दतीने परशरामानी केले आहे.

"जडीत जोहार ल्याली अंगावर नवीं नवतीचा नवा ।
वाळे रूमझुम पाईं झुमझुम बोलती जणूं चिमणीचा चिवचिवा ।
चोळी अंजिरी जरी काठाची रंग कटारी नवा ।
कवळी कर्दळी पिवळी कांति मृदु मिन्याचा रवा ।
चिरीं कुंकाची बारीक निटळीं घाम आला डवडवा ।
नेत्री अंजनी चित्रीं बाहुल्या पाहुनि आवडली जीवा ।
दोही बोटीं मुद्रिका दाट हातीं लखलखाट झाळकती चुडे ।
वर नीळ पाचुचे खडे ।
रस्त्यांत उभी राहून न्हूनन जशी विज तुटून कडकडून पडे ।
फाकली प्रभा चहूंकडे ।
मनसुबे करूनिया सुभें राहिले उभे तुजसाठी गडे ।
झाले गर्द मिशामध्यें वेडे ।

(अस्सल जरदी घोटी भिवरथडी,१९५)

शाहीर परशरामांच्या शृंगारिक लावण्या बहुजन समाजासाठी लिहिल्या गेल्या असल्याने त्यामधून येणारे शब्द साधे सरळ भाषा, तालबध्द प्रासात्मक व खटकेबाज अशी आहे. शृंगाराची अनेक चित्रे रंगविताना तरुणाच्या अंगी असणारा बहर, ज्वानीचा कहर, आपल्या लावण्यामधून परशरामानी रेखाटला आहे.

परशरामाच्या लावणीचा मुखडा अतीव सुंदर आहे. स्त्री सौंदर्याचे विविध अंगानी वर्णन करताना त्या तिचे रुप, तिची चाल, तारुण्य, पोशाख, तिच्या हालचाली, बोलण्याच्या लकबी तिने केलेला साज शृंगार, तिच्या तक्रारी इत्यादी गोष्टीचे चित्रण परशरामानी केले आहे.

"डौल ज्वानीचा फूल गुलाबी रुप नादर गुलपरी ।
पाई जोडवी खणाणा वाजे तंग चोळी तरतरी ।। ध्रु. ।।
थाट नवे नीत होट लाल करी पानें खाउनी सदां ।
असल शाहरची रहाणीवाली करी झुरक्यांतून अदा ।
जरी किनारी कोरदार तंग चोळी वर रंग उदा ।
उरी उम्टल्या नूतन गरसा झांकी पदर वरसुंदा ।
सहज उभी नटून सखी जशी वीज तुटून पडे वाटे ।

(डौल ज्वानीचा फूल गुलाबी रुप नादर गुलपरी, १९८)

मराठी वाङ्मयातील शाहिरी विभागामध्ये ज्या शृंगारिक लावण्या शाहिरांनी लिहिल्या आहेत त्या लावणीमध्ये जास्तीत जास्त स्त्री वर्णने रेखाटली आहेत. "स्त्रियांच्या शृंगाराला जास्त महत्व" दिले आहे. याला कारण शाहिरांच्या वेळची परिस्थिती होय. बाजीराव पेशवाईची सतत स्त्रियांच्या घोळक्यात राहण्याची सवय त्यामुळे शाहिरानी सुध्दा पेशव्याच्या दरबारात "स्त्रियांच्या शृंगाराचे वर्णन केले आहे. त्यामुळे लावण्यामधून शाहिरानी स्त्रिला महत्व दिले आहे. परशराम सुध्दा याला अपवाद नाही.

शाहीर परशरामाने आपल्या जवळ जवळ १६० लावण्यात जास्तीत जास्त शृंगारिक लावण्या लिहिल्या आहेत. परशरामाच्या या शृंगारिक लावण्याचे वर्णन करताना अलंकरणात विरहाचा उन्हाळा असला तरी मीलनाचा सोहळा किंवा पावसाळा पण जास्त प्रमाणात चित्रित केला आहे.

परशरामानी आपल्या शृंगारिक लावण्यामध्ये स्त्री पुरुषाच्या विविध अवस्था चित्रित केल्या आहेत. रामजोशी, होनाजीबाळा, प्रभाकर यांच्या लावण्यामध्ये जो उत्तानपणा व ग्राम्यता जाणवते ती परशरामाच्या लावण्या-मध्ये पाहावयास मिळत नाही. त्याचे कारण परशरामाची लावणी रचना श्रीमंतासाठी झालेली नव्हती तर ती ग्रामीण भागातल्या सर्वसामान्य लोकांच्या मनोरंजनासाठी तिची रचना झाली होती.

परशरामानी आपल्या लावणीमध्ये जी स्त्रियांची चित्रे रेखाटली आहेत ती साधारणपणे सोळा ते सतरा वर्षाची ऐन भरातीलच आहे. यौवनाने मुसमुसलेली आहे. सुरेख नयनाची, अंगावर लाल जरीचा शालू, तरुणाना बेचैन करणारी स्त्री रेखाटली आहे.

"वय दिसे सोळा सत्रात ।
जणू लिहिले भोजपत्रांत ।
तजवीर पेट चित्रांत ।
नयन सुरेख दोन्ही लाल आंगावर शाल दुपेटा जरी ।

(नयन सुरेख, पृ.२११)

परशराम आपल्या शृंगारिक लावण्यामध्ये सोळा ते सतरा वर्षाची तारुण्याने मुसमुसलेली, अलंकारानी सजलेली भरज्वानीने बहरलेली, तरुण पुरुषाना घायाळ करणारी रूपवती स्त्री रेखाटत असताना तत्कालीन सामाजिक, राजकीय

परिस्थितीबरोबर तत्कालीन चालीरिती, पेहरावे, संकेत, अलंकार, विशेष पदार्थ स्त्रियांचा दागिन्याचे व पोशाखाचे वर्णन करताना तमसोडी, नवहरी, बावडी, मस्तकी, मुदराखडी, हातीकुडे झालाकी, बाक्या, वेळा, दंडी माळ गळयात गळसरी ठुशी, पायी घोळ झडझुमती, साखळया सुरेदार नथ, चिच-पाने किसनीच्या बांगडया, पुढे गोट सुवर्णचारी, दोन्ही बोटी मुद्रिका, दंडात बाजु बंद या अलंकारासह स्त्रियांच्या पोशाखाचे काळी चंद्रकळा, बेगणिशी, चुनखडी, महेश्वरी पातळ, उरी शाल, तन काचोळी, आयने बसवलेली काचोळी, पीतांबर वर, जरी रेशमी, सोनकळा रंग पिवळी साडी, अशी विविधता परशरामाच्या लावणीमधील पोशाखामध्ये व अलंकारात दिसते. ही विविधता परशरामाने आपल्या अनेक लावण्यातुन चित्रित केली आहे. लावणी-मध्ये शृंगार रेखाटत असताना या अलंकाराचा व पोशाखाचा वापर परशरामानी केला आहे. तत्कालीन समाजातील वापरात येणा-या पोशाखाचे व अलंकाराचे दर्शन घडते.

परशरामानी शृंगारिक लावण्यामध्ये मीलनोत्सुक स्त्री पुरुषाच्या पुष्कळ लावण्या चित्रित केल्या आहेत. या मीलनोत्सुक लावण्यामधून जी स्त्री रंगविली आहे ती मीलनासाठी उत्सुक झालेली स्त्री आहे. ज्याप्रमाणे संतानी व पंडितानी कृष्ण-राधेच्या मीलनाचो वर्णने केली आहेत किंवा आधुनिक काला-तील रोमीओ-ज्युलियट किंवा लैला-मजनूच्या मीलनाच्या कथा प्रसिध्द आहेत त्याप्रमाणे परशरामाने देखील आपल्या लावण्यामधून मीलनासाठी आतुर झालेली स्त्री अनेक लावण्यातुन रेखाटली आहे. त्यापैकी एका लावणीत ते म्हणतात.,

"अजि बेत करा हो बंगल्याचा । हेत पुरवा राजसा मनचा ।। धृ.।।
मी परार्इत बाळपणाची । पुरवावी हौस मज मनिची ।
घडि भरलि सख्या मम रुचो । गशि कुस्ती करा पैचाची ।
(अजि बेत करा हो बंगल्याचा, १६०)

वरील लावणीतच तिने जी तक्रार केली आहे ती परशाराम रेखाटतात मीलनासाठी तळमळणारी स्त्री म्हणते की तुम्हाला कोणा दुसरी सवत भेटली आहे काय ? तुम्ही सैरावैरा भटकंती का करता. मी चटकचांदणी असताना तुम्ही असे का वागता. या सर्व गोष्टीचे साध्या सोप्या सरळ भाषेत परशाराम आपल्या कवनात करतात ते असे -

"कोणा सवत भेटली द्वारी । वाटली मजहून ती प्यारी ।
मी कळी गुलाबी गहिरी । तुम्ही कां भटकतां सैरी ।
मी चटकचांदणी बंबहरी । कां जातां त्यजुन अंधारीं ।

(अजि बेत करा हो बंगल्याचा, १६०)

पती विरहाने व्याकुळ झालेल्या पत्नीचे चित्र परशाराम उत्कृष्ट पध्दतीने रेखाटतात. एक स्त्री आपला पती प्रवासाला निघाला असताना ती स्त्री आपले दु:ख व्यक्त करते ते शब्द परशाराम आपल्या कवनामध्ये उत्कृष्टपध्दतीने रेखाटीत आहे.

"करुनिया दु:ख मला प्रवासाला जाल तुम्ही ।
नूतन नवीं नवतीचा बहार । आंगी मदन करितो कहर ।
येते सुखशयनाची लहर । कैसें करुं मी ।
(करुनिया दु:ख मला प्रवासाला ...१७४)

परशारामानी आपल्या लावण्यामधून स्त्री पुरुषांची विरहपर कवने चित्रित केली आहेत. स्त्री पुरुषाच्या विविध अवस्था चित्रित करताना एखादी स्त्री आपला पती प्रवासाला अगर मोहिमेसाठी परगावी जात आसे त्यावेळी स्त्रियांची जी अवस्था होत असे ती अवस्था वरील "करुनिया दु:ख मला प्रवासाला" या लावणीत रेखाटली आहे. पण "आज झाले दूरशी" या

लावणीत स्त्रीची वेगळीच अवस्था परशराम रेखाटतात. पती मोहिमेवर निघाला आहे. त्यावेळी पत्नी दूरशी झाली आहे. तेव्हा पती मिलना- साठी व्यथीत झालेली पत्नी आपल्या पतीला म्हणते,

"आताच झाले दुरसी कशीं येऊं ? मधी आडवी गंगा ।
चार दिवस अंतरलें सख्या तुमच्या सुखसंगा ।
(आताच झाले दुरशी, १६९)

परशरामानी आपल्या कवनामधुन अडवणीत येणाऱ्या स्त्रियांची चित्रे उत्कृष्ट पध्दतीने चित्रित केली आहेत. ग्रामीण भागातील वास्तवतेचे चित्रण परशराम आपल्या शृंगारिक लावण्यामधून रेखाटतात. पतीने त्याग केल्यानंतर होणारी पत्नीची अवस्था त्यानी चित्रित केली आहे. पतिने घरी यावे विचारपूस करावी आपले कोडकौतुक करावे, आपला भोग घ्यावा अशी शेवटच्या पातळीपर्यंत जाणारी स्त्री त्यांनी रेखाटली आहे. "असा का केलास माझा त्याग" या लावणीतील स्त्रीने लौकिकतेचा उत्कृष्ट आविष्कार गाठला आहे. या लावणीतील स्त्री आपल्या पतीची विनवणी करीत आहे. आपले सर्वस्व देण्यास तयार आहे. पण रात्र सोडा अशी विनवणी करीत आहे.

"असा कां केलास माझा त्याग । कुण्या गोष्टिंत धरिला राग ।
सख्या तुम्ही घरांकडे याल । उचलून कडयावरि घ्याल ।
प्रतीने मुखचुंबन घाल । दोन्हीं हातो जोबन माझे चुराल ।
घ्याल माझ्या नवतीचा सख्या भोग । कुण्या....। "
(असा कां केलास माझा त्याग...१६३)

"बोल काका लवतो डोळा" या लावणीत परशरामाने एका विरहीणीची स्थिती रेखाटली आहे. पती प्रवासाला गेला आहे. घरी कधी येतील हे कळत नाही. झुरून झुरून शरीर पांजर झाले आहे.

हातपायाच्या फुलवानी झाल्या आहेत. पण तेवढयात काळा आरवतो डोळा फुरफुरतो चांगले शकुन होतात व अचानक स्वारी घरी परत येते. या लावणीतून त्या काळातील ज्या समाजात शकून अपशकून बद्दल ज्या कल्पना होत्या त्या ग्रामीण कल्पनांचा वापर केला आहे.

"गेल्या दिवसापून कागदपत्र नाही आला संदेसा ।
झुरझुर पांजर आले शरीर किती करुं अंदेसा ।
ऐक सखे मी स्वप्न देखिले आज आश्चर्य राती ।
चोळी पातळ हिरव्या बांगडया दिल्या माझे हाती ।
ओटी भरून हाळदी कुंकू माझ्या निढळा लावी ।
शकुन चांगला तुजला झाला आम्ही अवघ्या नाही ।
बोले काळा लवतो डोळा फुरफुरती बाही ।
गेले प्रवासा घरी कधी येतील आमचे शिपाई ।
(बोले काळा.... २२६)

आपल्या पतीबद्दल तक्रार करणाऱ्या काही स्त्रियांची भावचित्रे परशरामाने रेखाटली आहेत. आपल्या नवऱ्याच्या नाकर्तेपणाबद्दल ती तक्रार करीत आहे. लग्न झाल्यापासून तो आपल्याकडे पाहत नाही. गावामध्ये रिकामटेकडा फिरत आहे. मला दागदागिने व वस्त्रे घेत नाही इत्यादी अनेक गोष्टीबद्दलची तक्रार अस्सल ग्रामीण भाषेत परशराम चित्रित करतात.

"मी लग्नाची बाईल याची हा तरी नवरा कसा ।
पांच तुम्ही परमेश्वर पारीं बसून याला पुसा ।
फक्त हळदीचा डाग लाविला केल्या दिवसांपासून ।
चोळी लुगडे काय घेऊन शिणला खरें खोटें घ्या पुसून ।

सांड गांवामधी फिरतो भांड रिकामटा असून ।
इकडीस काडी इकडे करिना घर कसें चालेल असून ।
हातात भाला म्हणावे घेऊं चाला उलटाच मणवर असून ।
तीन तुकड्याचे एक मुंडासे तिनदा बांधी कसून ।
(मी लग्नाची बाईल याची.... २३३)

शाहीर परशरामाने ज्याप्रमाणे आपल्या लावण्यांमधून स्त्रियांचा विविध अवस्थांची वर्णने केली आहेत त्याप्रमाणे पुरूषाची चित्रेही चित्रित केली आहेत. शाहिरी कवितेत पुरूष सौंदर्याला महत्वाचे स्थान नाही. पुरूष सौंदर्यापेक्षा स्त्री सौंदर्याचे विविधांगी दर्शन लावणीत पहाविले आहे. पण परशरामानी थोडीच पण उत्कृष्ट अशी काही पुरूषांची भावचित्रे रेखाटली आहेत. ती उल्लेखनिय आहेत.

स्त्रीला पाहून पुरूषाची जी अवस्था झाली त्याचे वर्णन परशराम "छबीदार सुरत गुलपरी" या लावणीत करतात. या लावणीत युवक युवती-च्या सौंदर्याचे वर्णन करतो.

"छबीदार सुरत गुलपरी गेंद दोन उरी ।
नयनांची खोचली सुरी जखम केली पुरी ।
पाहून मुखचंद्र कला रेखिला टिळा ।
पोषाख नवे नित्य करी कंचुकी उरी ।
नयनांची खोचली सुरी ....।
(छबीदार सुरत गुलपरी... १९५)

त्याचबरोबर "मोत्याचा झालरा कलस तुझ्या" म्हणाण्या मधरा या लावणीमधील पुरूष स्त्रिया साज शृंगाराचे वर्णन करीत आहे. त्या काळातील स्त्रियांच्या नटण्या थटण्याच्या ज्या पध्दती होत्या त्या पध्दतीचे

दर्शन या लावणीतून घडते हे वर्णन परशाराम आपल्या शैलीमध्ये करीत आहे.

"मोत्याच्या झालरा कळस तुझ्या म्हाणाच्या मखरा ।
उभी राहून लाजून बोलसी, किती करशील नखरा ।
वय नाही पण म्हाण आलें तुझ रंग गोरा भुरका ।
अटकर बांधा लहान कुची भुई वर शालुचा बुरखा ।
पाई पैंजण वाजती चाळशी हंसगती झरका ।
(मोत्याच्या झालरा कळस... १४७)

शाहीर परशारामानी लष्करी पुरुषाचे चित्रण आपल्या लावण्यामध्ये रेखाटले आहे. एक लष्करातील पुरुष स्त्रिचे सौंदर्य, स्त्रिचे यौवन पाहून बेचेन झाले आहे. स्त्रिच्या प्रतीमुळे त्याचे लष्करामध्ये जाणे थांबले आहे. स्त्रिच्या प्रतीसाठी पुरुष काय वाट्टेल ते करण्यास तयार असतो. त्याप्रमाणे खोटा आव आणून किंवा आपल्या पत्निची खोटी स्तूती करुन हा लष्करातील पुरुष प्रीतीसाठी लष्कर सोडून आला आहे. असे सांगतो. या लावणीमध्ये शेवटी कलाटणी केळी दिली आसलीतरी प्रथम आपण पत्नीच्या प्रेमासाठी कोणकोणत्या गोष्टी करण्यास तयार आहोत हे सांगितले आहे. त्यामुळे पुरुषांची आपल्या पत्निच्या मिलनासाठी चाललेली जी धडपड आहे ती परशारामाने रेखाटली आहे.

"लष्कराचे काय सुख सांगूं गे तुज नारी ।
तुझे प्रीतिस्तव ते सोडून राहिलों घरी ।"
(लष्कराचे काय सुख..... १५६)

शाहीर परशारामानी आपल्याशृंगारिक लावण्यामध्ये स्त्री पुरुषाच्या शृंगाराच्या विविध अवस्था चित्रित केल्या आहेत. परशारामांच्या या शृंगारिक लावण्यामधून यौवनात पदार्पण केलेल्या कुमारीकेपासून पुत्रप्राप्तीची इच्छा करणाऱ्या स्त्रिपर्यंत चित्रण केले आहे. या शृंगारिक लावण्यामध्ये

पती विरहाने झुरणारी नारी चित्रित केली आहे. त्याचप्रमाणे पत्नीच्या विरहाने व्याकुळ होणारा पुरुष चित्रित केला आहे. याबरोबर पतीबद्दल तक्रार करणारी स्त्रीही परशारामाने रेखाटली आहे. ग्रामीण वास्तव व जीवनाचे चित्रण ते आपल्या शृंगारिक लावण्यातून करतात. परशारामाच्या या शृंगारिक लावण्याबद्दल डॉ. गं.ना. मोरजे आपल्या ग्रंथात म्हणतात,[२] "परशारामाच्या लावण्यात मनाच्या हळुवार भावनाचे चित्र अभावानेच जाणवते. शृंगारात सूचकता वगैरेचा अभावानेच उपयोग केला आहे. परशारामांची भाषा मातीचा गुण घेऊन.आलेली आहे. त्यामुळे त्यामध्ये कुठलीही कृत्रिमता दिसत नाही."

अशा पध्दतीने शाहीर परशारामाच्या शृंगारिक लावण्यातून रामजोशी, होनाजीबाळा, प्रभाकर या शाहिरांच्यासारखा उत्तानपणा भडकपणा किंवा श्अश्लिलता जास्त प्रमाणात आढळत नाही. ग्रामीण भागातील युवक युवतीच्या भावभावनेची चित्रे लोकांच्या मनोरंजनासाठी लिहिली आहेत.

शाहीर परशारामाच्या शृंगारिक लावण्यांची काव्यवैशिष्टये पाहत असताना परशारामानी ग्रामीण वास्तवजीवनाची चित्रणे आपल्या लावण्यामधून रेखाटली आहेत. शृंगारिक लावण्यामध्ये विविध विषयांची विविधता आढळते. विषयांच्यामध्ये त्याने नवीनता आणलेली आहे. शृंगारिक लावण्यामधील स्वभावचित्रणे ही महत्वपूर्ण ठरली आहेत. युवक युवतीची वर्णने, पतिपत्नीची वर्णने महत्वपूर्ण ठरली आहेत. ही व्यक्तीचित्रणे त्यांच्या शाहीरितीतून अलंकारातून व पोशाखातून अधिक बोलकी वाटतात. त्यांच्या शृंगारिक लावण्या रामजोशी व प्रभाकरापेक्षा कमी प्रतीच्या वाटतात कारण परशारामाच्या शृंगारिक लावण्यात उत्तानता प्रसंगी ग्राम्यता ही कमी प्रमाणात जाणवते. परशारामाने शृंगारित

लावण्यामध्ये शब्दांची रचना सरळ सोपी व साधी ग्रामीण भागातील लोकांना समजेल अशी केली आहे. शाहिरी कवने ही गाऊन दाखवयाची असल्यामुळे त्यामध्ये लयबद्धता व नादमधुर्य उत्कृष्ट रीतीने आणले आहे. भोवतालच्या भागातील जीवनातील अनेक प्रसंग परशरामानी घेतले व ते आपल्या लावणीचे विषय केले. त्याच्या लावणीमध्ये कलाकुसर जास्त प्रमाणात नाही. गावरान उपमा व रूपकाचा वापर त्याच्या कवनामध्ये आढळतो. परशरामाच्या लावणीची सुरवात मोठी आकर्षक ठसकेदार व आशयपूर्ण असते. शृंगारिक कथेचे वर्णन करीत असताना कथेला दिलेली कलाटणी महत्वपूर्ण ठरली आहे. अशा अनेक वैशिष्टयाने परशरामाची शृंगारिक लावणी महत्वपूर्ण ठरली आहे.

## २) आध्यात्मिक लावण्या :

शाहीर परशरामानी ज्याप्रमाणे शृंगारिक लावण्या लिहिल्या आहेत त्याचप्रमाणे त्यानी आध्यात्मिक लावण्याही रेखाटल्या आहेत. मराठी शाहिरी वाङ्मयातील शाहिरी कवीचा आध्यात्मिक हा मुख्य विषय नव्हे पण संतसाहित्यापासूनच "अध्यात्म" हा विषय मराठी साहित्यातून जिव्हाळ्याने मांडलेला दिसून येतो. संतकाव्याचा तर अध्यात्म हा जणू आत्माच आहे. पंडितीकवीनी ही रामायण महाभारतातून आध्यात्माचा भाग चित्रित केला हिच आध्यात्माची धारा थेट शाहिरांपर्यंत येऊन पोहचली आहे.

परमेश्वर भक्तीबद्दल एकंदरीत हिंदुस्थानात कमालीचा आदर दिसून येतो. देवदेवते व तीर्थक्षेत्रे यांच्या पवित्र वातावरणातच हिंदू मन मोहून जाते. ज्ञानेश्वरापासून थेट तुकारामापर्यंत भक्ती हाच मंत्र सर्व संतानी वेळोवेळी सांगितला आहे. पंडितकवीनीही त्याच्याच पावलावर पाऊल

टाकून आपल्या वाङ्मयीन जीवनाची यशस्वी वाटचाल केली आहे. शाहिर कवितेवर त्यांच्याच कमीजास्त प्रमाणात परिणाम झाला आहे.

शाहिरांचे "कलगी व तुरा" हे दोन प्रकार प्रसिध्द आहेत. या प्रकारातून शाहिरांची आध्यात्मिकता दिसून येते. आध्यात्मिक प्रतिपादनासाठी लावणीचा जन्म झाला नसला तरी मराठी आध्यात्माचा प्रभाव इतका आहे की शृंगारिक कथाकवनातही आध्यात्मविचार आणण्याचा मोह त्याला होता. पेशवेकालीन समाज संताच्या आध्यात्माकडून शाहिराच्या दृष्टीकवनाकडे वळला होता. तरी देखील तो आध्यात्मिकनिष्ठ होता. महाराष्ट्रातील आध्यात्मिक शाहिरीची परंपरा खूप जुनी आहे. ती समाजाच्या अगदी खालच्या स्तरापर्यंत जाऊन पोहचली आहे. हे कलगी तु-याच्या शाहिरीवरून वाटते.

दृश्य जगताचा मायेचा पसारा व सोळा कलांचा देहभाव बाजूला करुनी साऊन सतरावी ज्ञानकला तिचे गीत गाणारा तो कलगी प्रश्न व मानव देहाच्या जागृती स्वप्न, या अवस्थेत जिवाला शिवाचे ज्ञान होत नाही. पण चौथ्या तुर्यो (तुरिया) अवस्थेतच जिवाशिवाची भेट होते. या तुर्यावस्थेतील शिवाला प्रधान माननारा जो प्रश्न तो तुरा प्रश्न होय. होनाजीबाळा, रामजोशी, हे तुरेवाले तर परशाराम, सगनभाऊ, हैबतीबुवा आणि पठ्ठे बापुराव हे कलगीवाले होते.

आध्यात्मिक शाहिरी केवळ लोकमान्सातच मान्यता प्राप्त झालेली होती असे नव्हे तर तिला राज्यमान्यताही लाभलेली होती. स्वतःच्या स्वतंत्र अशा वैशिष्ट्यांनी ती मराठी लोकजीवन व लोकसंस्कृतीचे अविभाज्य अंग बनली होती. आध्यात्माचे स्वरूप समजावून सांगताना प्रा. शिवाजीराव रामचंद्र चव्हाण आपल्या प्रबंधामध्ये म्हणतात, [3]

"भारतीय संस्कृती आध्यात्मप्रधान संस्कृती आहे. भारतीय मनाचे हे आध्यात्मिक कुतूहल वाढविण्याचे काम भारतीय साहित्य करीत आले आहे. कलगी तु-याचे काव्यही हे कार्य करते. सृष्टीच्या उत्पत्तीचा शोध घेणे हा या आध्यात्मिकतेचे एक भाग आहे. त्याद्वारे मानवी मन विशाल बनविण्यातच शाहिराचे प्रयोजन, भारतीय ऋषी मुनी, साधु संत आणि सिध्द साधकांनी त्या संदर्भात ब्रम्ह माया, पुरुष-प्रकृती, शिवशक्ती, त्या मुळांची जी माहिती वर्णिलेली आहे तीच कलगी तु-याच्याही शाहिराची मानली आहे."

शाहीर परशरामांच्या लावण्यामध्ये आध्यात्मिकता जास्त प्रमाणात दिसून येते. कारण शाहीरी वाङ्मयातील परशराम हा एकमेव शाहीर ह ईश्वरभक्तीचा पगडा असणारा आहे. त्यांना लहानपणापासून विठ्ठल भक्तीचे वेड होते. विठ्ठल हे त्याचे आवडते दैवत आहे. आपल्या आवडत्या दैवताचा उल्लेख परशराम प्रत्येक लावणीच्या शेवटी करतात. तो "नामी विठ्ठल" असा त्याच बरोबर परशरामाच्या जवळ जवळ प्रत्येक लावणीच्या शेवटी "परशराम येसू असा उल्लेख आलेला आढळतो. हा येसू कोण असावा याबाबत आजपर्यंत उलगडा झालेला नाही. पण हा येसू परशरामाच्या तमाशाच्या फडातील साथीदार असावा ज्याप्रमाणे महादू सुतार हा प्रभाकरचा साथीदार होता त्याप्रमाणे तो असावा.

आध्यात्मिक लावण्यामधून परशराम परमेश्वर भक्तीचे दर्शन घडविताना त्यात कृत्रिमता दाखवत नाही. काही शृंगारिक लावण्यामधून तो शेवटी हरिगुणावर येतो. इतर शाहिराच्यापेक्षा परशरामानी आध्यात्मिकता वेगळ्या पध्दतीने लावणी वाङ्मयात आणली आहे.

शाहिराच्या आध्यात्मिक कुटात निखळ आध्यात्मिक कुटे, पौराणिक कुटे, लौकिक कुटे असे प्रकार पडलेले पाहावयास मिळतात. शाहिरानी जी

कुटे वापरली आहेत ती रूपकाचा आश्रय करून व्यक्त केली आहेत. शाहिर परशरामानी आपल्या लावण्यामध्ये या तीन्ही कुटाचा समावेश केला आहे. परशरामानी ज्या आध्यात्मिक लावण्या लिहिल्या आहेत त्या लावणीमधून विश्वातील विविध गोष्टीचे वर्णन केले आहे. परशरामाच्या आध्यात्मिक लावणीबद्दल डॉ. मि. वि. गायकवाड म्हणतात, [४] "परशरामाच्या लावण्याचा एक विशेष म्हणजे त्यानी आपल्या लावण्यामधून अध्यात्म गोवण्याची केलेली करामत. त्याला सौरी, कुंटण, इत्यादी रूपकाची परंपरा आहे. त्यांच्या लावणीमधून व्यक्त होणारा व्याज अध्यात्म व त्याला मिळालेला शृंगाराचा साज पाहण्यासारखा आहे."

शाहिराच्या आध्यात्मिक कुटात विश्वाची निर्मिती कशी झाली विश्वनिर्मितीच्या घटक वस्तू कोणत्या माया ब्रम्ह यांचा संबंध काय असा स्वरूपाचे प्रश्न असतात. काही वेळा शाहिराच्या सवाल जबाबाचे स्वरूपाचे प्रश्न असतात. शाहीर परशराम देखील आपल्या लावण्यामधून विश्व-निर्मिती कशी झाली मांया ब्रम्हाचा संबंध काय त्याचप्रमाणे विश्वनिर्मिती-च्या घटक वस्तूचे वर्णन केले आहे. परशराम आपल्या "काळ्या गोरीचे" लावण्यामध्ये विश्वनिर्मितीबद्दलचे आपले मत उत्कृष्टरित्या मांडले आहे.

"कांहींच नव्हते रात्र काळी अक्षाई आदि अंत ।
शून्यापासून आकाशाकडे पाहे धादांत ।
आकाशापुन वायु त्याचा मिळा रंग नित ।
वायुपासून तेच तांबडे व्यापून आप श्वेत ।
आपापासून पृथ्वी झाली उर्जा तिचा पीत ।
(एकुणेरीला उर्जे बोलती.... ७०)

वरील लावणीमधून काळी गोरीच्या भांडणातून अध्यात्म मांडलेले पाहावयास मिळते. या लावणीत विश्वनिर्मितीबद्दलचे जे संकेत वापरले

आहेत ते परंपरेने आले आहेत. या लावणीतील काळी म्हणजे प्रवृत्ती अज्ञान याचे प्रतिक असावे असे विविध संकेत वापरून आध्यात्म स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात.

परशराम दुसऱ्या एका लावणीत जगाच्या निर्मितीची कल्पना स्पष्ट करतात. त्या लावणीमध्ये त्यानी मायेपासून हे त्रिगुणात्मक जग तयार झाले आहे असे सांगतात.

"दुर्घट माया ब्रह्मादिकांही ऐक कवीच्या मुला ।
शोधाला नाही अंत लागला काय समजले तुला ।
निरगुण शून्यापून शून्याकार निरगुण इच्छाकळे ।
इच्छा नारी अचळ चळेना ज्योतिर्मय आगळे ।
स्वयं ओंकार म्हणाती तयाला शून्य तेच मावळे ।
ओंकारातुन माया झाली तिऱ्यापून झाळझाळे ।
मायापासून त्रिगुणात्मक हे तिन्ही गुण जाळे ।
(दुर्घट माया ब्रह्मादिकाही...७८)

विश्वरचनेचा विचार केल्यानंतर किंवा जगाची निर्मिती कशापासून झाली याचे वर्णन केल्यानंतर कालमापन व काळाचे सांकेतिक पारंपरिक वर्णन परशराम आपल्या "अंतपार हरीचा नाही कळला" या लावणीत करतात.

"चार युगे सहस्त्र केलां एक ब्रह्माचा दिवस झाला ।
तितकीच युगे रात्री खाली करून वाटणी नीट बोला ।
सवा लक्ष घडी मोठी पळभर आणू विश्रांती नसे ज्याला ।
एक्या दिवसांतुन चवदा इन्द्र दहा अवतार महाविष्णूला ।
असे दिवस ब्रह्माचे तेव्हां घडी भरतसे विष्णूला ।
(अंतपार नाही हरीचा कळला.... ७२)

परशरामाची "दहा शिंदळक्या करीन करीन" ह्या लावणीचे बाह्यांग शृंगारिक आहे पण अंतरंग पूर्णपणे आध्यात्मिक आहे. या लावणी-मध्ये जीव हा शिवाकडे आत्मा परमात्माकडे जाण्यासाठी आसुसलेला आहे. परमात्म्याचे निवासस्थान म्हणजे आत्म्याचे जणू माहेर. एखादी माहेर प्रेमी स्त्री सासरच्या जाचणीला कंटाळलेली असते. तिचे चित्त माहेराकडे धाव घेते त्याप्रमाणे आत्माचे लक्ष परमात्म्याकडे त्या माहेराकडे लागून राहिलेले असते. ही लावणी देहविक्रय करणाऱ्या एखाद्या बाजार स्त्रीच्या वर्णनाप्रमाणे वाटते. पण शाहीर परशरामाना यातून आध्यात्म सांगावयाचा आहे. या लावणीतील शब्दांना दोन अर्थ प्राप्त झाले आहेत.

"दहा शिंदळक्या करीन परंतु एक लग्नाचा नको नवरा ।
माहेरी माझे चित्तमन रमले सासरचा नको वारा ।
आधीच मी चंचल पहिल्यापुन मूळ माहेरी गडे फंद पडला ।
(दहा शिंदळक्या करी.. पान.नं.७६)

त्यानंतर शाहीर परशरामाच्या "दहा शिंदळक्या करीन" याच लावणीत कामक्रोधाचे दुबाडपणा स्पष्ट करतात. काम, क्रोध, मद,मत्सरादि, हे षड्रिपू होत ते अतिशय दुष्ट होते. त्याच्या मुळेच या जगातील विविध विषयात आत्मा रमतो. या षड्विकारापासून वैराग्य मिळाल्याशिवाय परमात्मा "लाभणार नाही"असे परशरामाना या लावणीत सांगावयाचे आहे. ते सांगताना परशराम म्हणतात,

"काम क्रोध हे सर्व छपावून सोदे शिकंदर गडे पाजी ।
वैराग्य पलंगी शेज सवाज नामावर पुष्पे ताजी ।
परपुरुषाची चटक लागली त्यावर मर्जी खुष माझी ।
(दहा शिंदळक्या करीन.. पा.नं.७६)

योगमार्गाचे वर्णन करताना परशराम म्हणतात, यमनियमादि अष्टांगामी योग्याचा प्रवास अवघड वाटेनेच होत असतो असे असले तरी या प्रवासानेच योग्याच्या आत्म्याचा विकास होतो" या लावणीमध्ये वापरलेली सतरावी अवस्था, त्रिवेणीसंगम, या शब्दांना योगशास्त्रात विशिष्ट अर्थ आहे.

"चढून घाट अवघड वाट वर वाहे झुळझुळ पाणी ।
सतरावी पुढे दुसरी तिसरी एकीहून एक चढी शाहाणी ।
त्रयी अवस्था त्रिवेणी संगम फणफणाट फणाके भवरा । "
(दहा शिंदळक्या करीन...पा.नं. ७७)

अशा विविध लावण्यातून परशरामानी आध्यात्माची गोडी चाखावयास दिली आहे. त्याच्या आध्यात्मिक लावण्यामधून त्यांनी शृंगार आणलेला पाहावयास मिळतो. व अनेक शृंगारिक लावण्यामधून अध्यात्म आणलेला पाहावयास मिळतो.

शाहीर परशरामाच्या लावणीवर संत व पंडिती काव्याचा जो परिणाम झालेला आहे तो शाहिराच्या आध्यात्मिक लावणीत पाहावयास मिळतो. संतानी व पंडितानी ज्याप्रमाणे विश्वनिर्मितीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला त्याप्रमाणे शाहिरानी ही विश्वनिर्मितीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. हा विश्व निर्मितीचा शोध घेताना परशराम म्हणतात,

"मायबापाची लेक लाडकी बसली आढी धरून
इजला प्रकार याचा करून ।
बापा आधी लेक जन्मली नारी आधी पिता
पोरीला ठाऊक म्हणती माता ।
ब्रम्हा विष्णूमहेश आदि शिवाची कांता
तिचा अंत न कळे सर्वथा ।
(मायबापाची लेक लाडकी.. पान.नं.८३)

वरील लावणीमधून तर नारीमध्ये आधी कोण जन्मले हाच प्रश्न विचारला आहे. या प्रश्नाबरोबर प्रचंड शक्तीशाली मायेबद्दल विचार मांडले आहेत माया म्हणजे ~~[illegible]~~ परमात्माची हालती बोलकी बाहुली आहे. ~~[illegible]~~ परमात्म्याच्या प्रेरणेमुळेच ही माया उत्पत्ती स्थिती व लय आशा गोष्टी करीत असते. परम्यातम्याच्या मनात जगदुत्पत्ती करावी असा विचार आला व त्याने जगादि सर्व वस्तु असलेले सर्व सम्यवेशक असे मोठे अंडे निर्माण केले. तेच या ब्रह्मांडाच्या उत्पत्तीचे मूळ होय. याच अंडयातून विश्वाचा पितामह निर्माण झाला. ब्रह्मा, विष्णू, महेश आदि निर्माण झाले. यातूनच एकवीस प्रजापती सक दक्षपुत्र निर्माण झाले व विश्वाची निर्मिती झाली अशा वेगवेगळ्या अर्थानी परशरामानी आपल्या लावण्यामध्ये विशाल आणले आहे.

शाहीर परशरामाच्या आध्यात्मिक लावण्यांमधून विविध अंगी गोष्टीचे दर्शन दाखवले आहे. हे दर्शन दाखवत असताना त्यांनी शृंगाराचा उत्ताणपणा काव्यामध्ये केलेला पाहावयास मिळतो. शृंगारिक लावण्यामधून शेवटी आध्यात्माकडे वळण घेतात. परशरामानी "मायबापाची लेक लाडकी" या लावणीत आदिमायेचे वर्णन काव्यपूर्णरित्या परशरामानी केले आहे.

" "सप्तसमुद्राचे पाणी जिला प्याया ।
अग्नीचे जिने केले कुंकू त्याली क्पाळभरून ।
सप्तधातुची नथ नाकामधि नव खंडाच्या माळा
घालूनि बसली स्वये गळा ।
निरंकार रंकार दोन्ही दंडातील वेळा
नेसली चिन्मय चन्द्रकळा ।
नव शून्याचे केले कंकण त्याली हात भरून ।
(मायबापाची लेक लाडकी..पा.नं. ८४)

या आदिमायेच्या वर्णनाबरोबर अनेक गोष्टीचे चित्रण या लावणीत केले आहे. ज्या स्त्रीने रवीची राखडी व नक्षत्रांची बाळी केलेली आहे. आकाश व धरती यांची सुवर्णमय कांचोळी तिने परिधाण केलेली आहे. जिचे पाय सप्तपाताळात आहे मेरु मांदार आपल्या पोटी खोचिला आहे शोभाचा शिणगार करुन डोई सोडून ती बसली आहे. असे आदिमायेचे वर्णन परशरामानी केले आहे.

पेशवाईतील शाहिरात या अध्यात्म विषयातील कलगी तु-याचा वाद होता. गळी आणि राळ, यांची चुरस नेहमी चाले तर होनाजी बाळाला संगनभाऊ म्हणावे "होना गळ्याचा झाला चुना" कलगी तु-याची ही चुरस परशरामाला अनिष्ट वाटे त्यावेळी परशरामानी अशा वादाला दिलेले उत्तर महत्वाचे आहे.

"जसे झाडाला बीज बिजापुन झाला होणें जाणें ।
लहान मोठा नग गाठिला आदी अंती एकच सोनें ।
सगुण निर्गुण एकच वस्तु आगळी अक्षरानें ।
अभेदाशी भेद लावशील जाणत असें गाशील गाणें ।
तुझी आई कलगी बाप तुझा तुरा कां करशील लटका वाद ।
कलगी तु-याशी निंदून गाईल.... ।
(सगुण निर्गुण शोधून पहाता.. पा.नं.८६)

शाहीर परशरामाच्या इतर महत्वाच्या ज्या आध्यात्मिक लावण्या आहेत त्यामध्ये "नाव लावणी रुप लावणी" 'निराकार आकार बानिसी' पंचप्राण तुजपाशी" रंगरागिणी नाचन किर्तन ज्या स्थळी, केवळ थोडे बाई पुरुष" इत्यादी लावण्यामधून अध्यात्म विचार महत्वपूर्णरित्या मांडले आहेत.

"नाव लावणी सम लावणी" मध्ये ब्रम्हांडाची निर्मिती कशी झाली यांचे वर्णन केले आहे.

"प्रथम निघाला ऋग्वेद सगळा दर्दुर मुखातुनि निका ।
अश्वमुखी यजुर्वेद निघे सामवेद श्वा मुखा ।
चतुर्थ वेद अथर्वण ऐका आला मुखी जंबुका ।
चहु वेदा चार वाणी म्हणती शास्त्राधार हा पका ।
चहु वेदी षट्शास्त्रे झाली अंकुरे अशि लावणी ।"
(नांव लावणी सम लावणी..पा.नं.८०)

अशा पध्दतीने इतर लावण्यातून आपला आध्यात्मिक अधिकार सर्वसामान्याला जाणवून देणे बौध्दीक चमकीतून आपल्या ज्ञानाची छाप इतरावर पाडण्याचा प्रयत्न करणे. आपली बहुश्रुतता लोकांच्या निदर्शनास आणणे हिच प्रयोजने त्यांच्या आध्यात्मिक लावणीची दिसतात.

शाहीर परशरामाचा आध्यात्मपरता हा आवडीचा विषय आहे. आध्यात्मिक अनेक लावण्यामधून त्याच्या आध्यात्मिक गुणाचा अभिप्राय येतो. परशरामाने शृंगारिक लावण्या रेखाटल्या असल्यातरी त्या इतर शाहिराच्या मानाने अल्प आहेत. हे त्याच्या शृंगारिक लावण्यावरुन कळते. शृंगारिक लावण्यामध्ये उत्ताणपणा कमी आहे. परशरामाच्या अनेक लावण्यानी लोकांच्या मनावर भुरळ घातली आहे. हे त्यांच्या आध्यात्मिक काव्याचे महत्वाचे वैशिष्टय आहे. शाहीर परशरामानी आपल्या आध्यात्मिक लावण्यामधून परमेश्वराबद्दलची श्रध्दा व्यक्त करण्यासाठी त्याचे सगुण रुपवर्णन करावयाचे हा हेतु साध्य केलेला आहे. अशा वेगवेगळया गोष्टीनी परशरामाची आध्यात्मिक लावणी महत्वपूर्ण ठरली आहे. त्यातून परमेश्वर विषयक आसणारी तळमळ दिसते.

३) सामाजिक लावण्या :

कोणत्याही साहित्याची निर्मिती होत असताना ते ज्या काळात निर्माण झाले त्या काळाशी त्याचा संबंध असतो त्या साहित्यातुन राजकीय, सामाजिक, तत्कालीन रितीरिवाज भाषा संकेत त्या साहित्यातुन येत असतात मराठी शाहिरी वाङ्मयामधून त्या काळातील राजकीय, सामाजिक, धार्मिक परिस्थितीचे चित्रण पाहावयास मिळते. शाहीर परशारामाच्या बहुसंख्य लावण्यामधून तत्कालीन समाज संकेत कौटुंबीक व्यवस्था इत्यादी गोष्टीचे तपशिलवार वर्णन केले आहे.

शाहीर परशराम हे श्रीमंताच्या आश्रयाखाली न वाढलेले सर्व सामान्य लोकांतील सर्वसामान्य माणसाच्या भावना व्यक्त करणारा शाहीर आहे. त्याची भाषाशैलीही सर्वसामान्यासाठी आहे. समाजाचे निरीक्षण सुक्ष्मपणे करुन अनुभव प्रामाणिकपणे मांडण्याची कला परशरामाकडे आहे. परशरामाना आपल्या सामाजिक लावण्यात समाजातील निरनिराळ्या स्तरातील उदाहरणे घेतली आहेत. परशरामाच्या काल म्हणजे पेशवाई व इंग्रजांचा काळ होय. या दोन राजवटीचे व त्या राजवटीत समाजाचे जे दर्शन घडते ते आपल्या कवनात रेखाटले आहे.

मराठी साहित्यातील शाहिरानी आपल्या पोवाडे व लावण्यातुन समाजजीवनाचे चित्रण केले आहे. तत्कालीन स्त्री पुरुषाच्या विविध अवस्थांचे दर्शन लावण्यामधून शाहिरामीक केले आहे. त्याचबरोबर तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक परिस्थिती लावण्यामधून शाहिरानी चित्रित केली आहे. पुरुषापेक्षा स्त्री जीवनाचे विविध अंकुर लावणीत चित्रित केले आहेत.

शाहीर परशरामानी आपल्या सामाजिक लावण्यातुन पेशवेकालीन चालीरीती, पेहरावा, अलंकार, पतीपत्नीचा शृंगारच्या विविध अवस्था

चित्रित केल्या आहेत. परशरामाच्या महत्वपूर्ण ठरलेल्या पोवाडयातून पेशवेकालामध्ये आसणारी बेबंदशाही किंवा अभियंत्रीत राजेशाहीचे चित्रण उत्कृष्टरित्या केले आहे. "आंधार नगरी बेबंद राजा" या पोवाडयातून बाजीराव पेशव्याच्या अंधाधुंदी कारभाराचे वर्णन सोप्या सरळ भाषेत परशराम करतात.

"आंधार नगरी बेबंद राजा न्याय नीती कैची ।
ठाके ठोक ठगाई करून राहिला पत त्याची ।
(आंधार नगरी बेबंद ... पा.नं.२५२)

दुसऱ्या एका महत्वाच्या पोवाडयात परशरामानी धर्माबद्दलचे चित्रण केले आहे. धर्म कोणत्या पध्दतीने बुडत आहे दैवते लोपली जात आहेत, सरदार पुरूषार्थ विसरले वैभव नष्ट झाले इत्यादी गोष्टीचे चित्रण परशरामानी चित्रित करतात.

"संकट मोठे । युगांत आलासा वाटे ।
आचरण खोटें । संकट मोठें ।
बुडाला धर्म । हरपले नाणे ।
विसरले सत्कर्माचें भाणे । लोपदेवताचे पुरले देणं ।
नगरी दिसती उदासवाणे । तेजहीन राजे निरअभिमानें ।"
(संकट मोठे युगांत. पा.नं. २६३)

वरील पोवाडयातून परशरामानी इंग्रजी सत्तेचे भारतावर आगमन झाल्यावर महाराष्ट्राची जी परिस्थिती झाली त्याचे वर्णन केले आहे.

त्याच्या "सोनार शिक्का नवा निघाला" या लावणीत पात्रता नसलेल्या लोकांची केवळ ढोंगबाजी करणाऱ्या व पोकळबढाई मारणाऱ्या लोकांची परशरामाने चांगलीच टर उडविली आहे.

"हत्यावर जरी दिली अंबारी मटकन बसेल भारानें ।
लिवडे वर तलवार मारते शिपायांशी पुसतें कोण ।
कोल्हे कुत्रे भुंकूं लागले हत्ती पळेल काय भिऊन ।
भीक मागून पित्र घालशी तर स्वर्गी कैसा वाजेल घंटा ।"
(सोनार शिक्का.... पा.नं. १०५)

अशा या समाजाला वळणीवर आणावयाचे असेल तर शाहीर परशराम त्याच लावणीत रामबाण औषधी सांगतात,

"कथा भागवत शास्त्र पुराण हरीचे गुण कोणी गागा ।
नामें विठ्ठलचे असे धडाके ऐकुन मुर्दा होय जागा ।"
(सोनार शिक्का.... पा.नं.१०४)

शाहीर परशराम तत्कालीन रूढी समजुतीवर चाल चालवणूकवरही प्रकाश टाकला आहे. समाजातील लहान सहान गोष्टीचे चित्रण करीत असताना त्यांचे सुक्ष्मावलोकन स्पष्टपणे जाणवते. तत्कालीन समाजातील गर्भवारिणीचे कोड कौतुक होत होते. गर्भवती स्त्रीला कोणत्या पध्दतीने सुरक्षा दिली जात होती तिच्या डोहाळ्यातुन व विलासाच्या वर्णनातुन उत्कृष्ट पध्दतीने मांडले आहे. गर्भवती स्त्रीस मुल होताच होणारा आनंद त्या आनंदाचे वर्णन त्याचबरोबर घरातील व्यक्तीना होणारा आनंद अशा विविध अवस्थाचे वर्णन परशराम करतात. त्याकाळातील गर्भवती स्त्रीला जे महत्व होते ते आपल्या लावणीमध्ये परशराम स्पष्ट करतात. त्याची "गर्भ राहिला मला आता बाई" ही लावणी महत्वपूर्ण ठरली आहे.

"आला प्रेमाचा पान्हा मजला मुख पाहूं या आधी ।
वाजंत्री वाजतील वाजूयां पूर्वापरी ज्या विधी ।
पभोताल्या उभ्या बायका नमस्कार करी पदी ।
नारळानें भरी ओटया साकरा घालून मुखामधीं ।

गर्भ राहिला मला आतां बाई हरला अवघा शीण ।
जन्मी आल्याचें सार्थक झालें फिटलें वांझपण । "

(गर्भ राहिला मला ....पा.नं.१८४)

पेशवेकालीन स्त्रियांची विविध अंगे रंगविताना परशरामानी त्या काळामध्ये निपुत्रिक स्त्रियांची दुःखे रेखाटली आहेत. एका स्त्रीला बारा वर्षे मूल न झाल्याने तिला समाजात जी बोलणी खावी लागली त्याचे वर्णन परशराम करताना म्हणातात,

"मी बारा वर्षे एक ठाक न्हालें आधीं ।
जीव सुकला माझा बाई नाही बाळक झाले कधीं ।
कर दुसरी बायको जन म्हणाती दुर्बुध्द । "

(नव नवसाचे बाळ एक... पा.नं.२१३)

या परशरामाच्या लावणीवरुन त्याकाळात मूल झाले नाहीतर दुसरे लग्न करण्याची जी प्रथा होती त्याचे चित्रण केले आहे. समाजामध्ये त्या काळात असणारी अंधश्रध्दा म्हणजे एखाद्या देवाला नवस करणे या नवसाचे वर्णन करताना परशराम म्हणातात,

"केले नवस भोय बगाडे खेळन ।
केले वेधवाणी बाई पंचाक्षरी जमविले ।
सुप हलविले देव देव्हारी घुमारे आणून घुमविले ।"

(नव नवसाचे बाळ.. पा.नं.२१४)

मुल झाल्यानंतर स्त्रीला होणारा आनंद त्याआनंदाचे सुख सोहळे, गर्भपणातील स्त्रीचे कोड-कौतुक या सर्व सोहळयाचो वर्णने परशराम आपल्या लावणीत सरळ साध्या भाषेत करतात.

परशरामानी स्त्री मनाचे चित्रण अनेक लावण्यातून केले आहे. त्यामध्ये "गर्भ राहिला मला आता बाई" होईना पुत्रफळ. या लावणीतून ते उठून दिसते. अशा स्वभावाच्या परशरामाचा लावण्यातून ग्रामीण जीवनाचे अस्सल चित्र सुक्ष्मपणे रेखाटले आहे.

"होइना पुत्रफळ" या लावणीत निपुत्रिक असणे म्हणजे स्त्री जीवनाला लागलेला शाप आहे. अशा निपुत्रिक स्त्रियांकडे पाहण्याची समाजाची दृष्टी वेगळी होती. निपुत्रिकपणाला स्त्रीच जबाबदार आहे असे त्याकाळातील समाजाला वाटत होते. अशा स्त्रियांची चित्रण परशराम आपल्या लावणीत करतात.

"उभयता सुखसेजेवे मला रंगमहाली ।
विषयात मग्न अशी वर्षे पाच सहा झाली ।
माझ्या वयीच्या पोरी त्यास मुले झाली ।
म्याकाय तरी देवाची चोरी केली ।
कीं पूर्वजन्मी फळे नव्हती वाहिली ।
म्हणून वांझ मी म्हणाती जगाची बोली ।
(होइना पुत्रफळ.. पा.नं. २५१)

पुढे याच लावणीत समाजात त्या काळी असणारी अंधश्रध्दा रुढी, परंपरा, चित्रित केल्या आहेत. पाच सहा वर्षे मुलबाळ न झाल्याने ती अगदी व्याकूळ होऊन गेलेली आहे. शेवटी त्या स्त्रीने अनिष्ट अंधश्रध्दावर विश्वास ठेवला आहे. त्याकाळामध्ये देवाचे नवस फेडण्यासाठी लाग्या लागणाऱ्या वस्तूचे चित्रण ही परशराम आपल्या लावणीत करतात. या वस्तूमध्ये कापूर, उद, विडयाची पाने, लवंगा, केळी, जायफळ, खारका, उपराल्या पंखाचा कोंबडा, नारळ, हिरवे पातळ, चुडा, सव्वा रुपया, इत्यादी गोष्टीचे चित्रण परशराम करतात. या वस्तू काव्यामधून परशराम आपल्या ठसकेबाजपणाने रंगवितात. ते असे -

"गेली सुपल्लविच्या घरी दो नव दिवसा ।
म्हणे कापूर उद घेऊन येइ थोडासा ।
तुज सर्व पहू देणार नाही बाई लक्षा ।
एक सगट सुपारी लागेल पाऊण पैसा ।
विडयाची पानं शंभर लवंगा तिन विसा ।
वीस केळी जायफळ खारका दोन बाई सा ।
एक आण कोंबडा उपराटे घर ऐसा ।
नउ लिंबे तिधारी नारळ एक तैसा ।
एक हिरवे पातळ खण आण हिरवा जैसा ।
भर चुडा आईला हिरवा कंचन जैसा ।
घागर डोळस भर गव्हाने सवा रूपया वरता ।
मज आशा नाही गुळ तांदुळ निवदा पुरता ।"

(होईना पुत्रफळ... पा.नं. २५२)

अशी नवस सायास करून थकलेली अनेक देवदेवता व तीर्थयात्रा करून दमलेली स्त्री शेवटी पंढरपूरला येते. एकादशीच्या वारीतून हरीनामाचा गजर करीत जाते. चंद्रभागेत स्नान करते. विठ्ठलाचा प्रसाद घेऊन घरी येते. आणि आश्चर्य म्हणजे तिला पुत्ररत्न होते. यामुळे ती आंनदित होते. या लावणीतून शाहीर परशरामाना आपली परमेश्वर भक्ती सिध्द करून दाखवायची आहे. त्याकाळामध्ये होणा-या तीर्थयात्रा या कोणत्यातरी फळाची आपेक्षा करीत असत हे वरील लावणीवरून सिध्द होते. त्यामुळे त्याकाळातील समाजाची देवावर श्रध्दा होती हे सिध्द होते.

शाहीर परशरामाच्या काळात "निपुत्रिकपणाबद्दल" समाजामध्ये जो गैरसमज होता त्याचे वर्णन त्यानी केले आहे. पेशवेकालामध्ये वे पुत्रप्राप्तीला महत्व होते त्याचे वर्णन लावण्यातून केले आहे. गर्भवती झाल्यावर स्त्री चे कौतुक होत होते. गर्भ राहिल्यामुळे आपले सार्थक झाले असे म्हणणारी स्त्री

परशरामानी रेखाटली आहे.

"गर्भ राहिला मला आता बाई हरला अवघा शिण ।
जन्मा आल्याचे सार्थक झाले फिटले वांझपण ।"
(गर्भ राहिला मला आतां बाई... पा.नं.१८२)

स्त्रीला डोहाळे लागल्यानंतर ज्या वस्तू तिला खाण्यासाठी दिल्या जातात त्या वस्तूंचे चित्रण परशराम आपल्यालावणीत करतात.

"होत डोहाळे पती मज पुरवी हात घालुनिया गळा ।
ओले नारळ फणस केळें । दाळिंबे द्राक्षे टक्के ।
पोप खिरण्या खजूरा पिकले । अंजीर आणि आंबे आवळे ।
रामफळे सिताफळें गें यें । जांभुळे जांब बोरें ।
असे विलास नानापरीं । डोहाळेजेवण घरोपरीं ।"
(गर्भ राहिला मला... पा.नं. १८३)

अशा पध्दतीने शाहीर परशरामानी आपल्या कवनातून ग्रामीण वास्तव जीवनाचे सुक्ष्मचित्रण केले आहे. त्या सुक्ष्मचित्रणातील ही महत्वाची लावणी आहे. परशरामाची याच पध्दतीची "पोट पिकेना म्हणून बांधिले" ही लावणी आहे. या लावणीत पोट पिकेना म्हणून त्रस्त झालेली स्त्री रेखाटली आहे. पोटी पुत्र असल्याशिवाय समाधान वाटत नाही त्यासाठी या लावणीमधील स्त्री विविध उपाय करते. त्यामध्ये विविध देवताची तीर्थ-यात्रा नवससायास करते शेवटी विठ्ठलाच्या कृपेने पुत्रप्राप्ती होते असे चित्र रंगविले आहे.

"फळ पुष्पाविण झाड नसे नाही सुख संसारीं येऊन ।
असें वाटतें संख्यां मारावें पुढी जहराची खाऊन ।
वेळांत वेनगंगा उभयतां आलो जोड्यांने न्हाऊन ।

करू नये ते उपाय केले आधिक तास्ति साहून ।"
(पोट पिकेना म्हणान... पा.नं. २१८)

मानवी मनाच्या विविध अवस्था परशाराम उत्कृष्टपध्दतीने चित्रित करीत आहे. त्यामध्ये स्त्री मनाची चित्रे उत्कृष्टपध्दतीने रंगविली आहेत. कुटुंबामध्ये त्याकाळी असणारा संघर्ष ही चित्रित केला आहे. नव-याला कुटुंबातुन वेगळे निघण्यास सांगणारी स्त्री रेखाटली आहे. अशा विविध स्त्रीयांची चित्रे रेखाटली आहेत. ही स्त्रीयांची चित्रे रेखाटलेली पाहून एकनाथाचा भारुडाची आठवण आपल्याला येते. परशारामानी एकनाथाच्या भारुडाचा अभ्यास करुन तो लावणीच्या स्वरुपात लोकांच्यासमोर मांडला आहे. एकनाथानी बहुजनसमाजासाठी, अज्ञानी जनांनासाठी, त्याना समजले, रुचले आणि पचेल अशी रचना केली आहे. हया रचना बहुजनांच्या नित्याचाच जीवनातील संसारातील चित्रित केल्या आहेत. एकनाथानी ज्याप्रमाणे "बाई मी भोळी ग भोळी" या भारुडातुन स्त्री मनाचे चित्रण केले आहे. त्याप्रमाणे संसाराचा सत्यानाश करणारी स्त्री परशारामाने चित्रित केली आहे. परशारामानी चित्रित केलेली स्त्री नव-याला एकत्र कुटुंबातुन वेगळे निघण्यास सांगत आहे. वेगळे राहणे म्हणजे स्त्रिच्या आनंदाचा विषय तत्कालीन स्त्रीला वेगळे राहावे असे वाटत होते. घराबाहेर पडून वेगळा संसार थाटण्याची मनीषा बाळगणारी पुरुष हे आपल्या पत्नीच्या सांगण्यावरुन वागत होते. स्त्रियांच्या हक्कात असणा-या पुरुषाचे चित्रण परशाराम आपल्या लावणीत रेखाटतात त्यानी "दुधड नार नव-याला शिकवी" या लावणीमध्ये नव-याला शिकवणा-या स्त्रीचे चित्रण केले आहे.

"दुधड नार नव-याला शिकवी म्हणे वेगळे निघा ।
जहामर्दी संसार दाविते करुन तुम्हाला बघा ।"
(दुधड नार नव-याला शिकवी.. पा.नं.९४)

ग्रामीण भागातील वास्तववादी चित्रण परशराम वरील लावणीतून करतात. चार भावांच्यामध्ये आपण शेतावर राबावयाचे इतर भाऊ ऐष-आरामात जगतात. इतर भावाचे आपण चाकर झालो आहोत, मला घरात सर्वचोचूण बोलतात, कर्जाचा डोंगर झाला आहे तेव्हा ताबडतोब वाटून घ्या असा सल्ला वरील लावणीतील स्त्री देत आहे.

"बायकोची अक्कल खोटी । जिवीं धरून बांधल्या गाठी ।
पहा केवढी कळीची काठी । भावाभावात पडल्या तुटी ।
वेगळेपणाची हौस मनामध्यें आगीन करी धुगधुगा ।
निमित्ताशीं केली पुढे बायको, आपण राहिला उगा ।"
(दुधड नार..... पा.नं. ९५)

बायकोच्या शिकवणीप्रमाणे वागणारा पती आपल्या भावाकडून वाटून घेतो. वाटणी करून पती पत्नी, पत्नीच्या माहेरी जातात. पण माहेरी गेल्यानंतर या दोघांची परिस्थिती हालाखीची झाली. दुष्काळाने शेती पिकनाशी झाली. त्यातच बैल मरून जातो. मंजुरी करू लागतात. पण पोट भरत नव्हते. देहाच्या चिंध्या झाल्या -

"झाली दशा आली अवकळा । डोई चिंध्यांचा झिळमिळा ।
गेला विसरून टाकमटिळा । देह वाळून झाली पिळा ।
विळा घेऊन मग करी मजुरी दोहींकडून तुटला लगा ।
दाणे खाऊन करी गुजराण दांतांच्या बसल्या शिगा ।"
(दुधड नार.... पा.नं. ९६)

अशी हालाखयाची स्थिती झाल्यानंतर शेवटी नवरा वळणावर येतो. आपण बायकोच्या शिकवणीमुळे चुकलो हे शेवटी त्या पतीला कळल्यावर तो आपल्या भावाची माफी मागतो. बायकोच्या सांगण्यावरून संसाराचे झालेले

वाटोळे व शेवटी वळणावर येणाऱ्या पतीचे चित्र उत्कृष्टपध्दतीने चित्रित केले आहे.

"बायकोच्या अक्लेनें झाली थोराथोरांची दशा ।
ढोर वेगळे सोडून निघती मायबापाची आशा ।
गेला शरण भावासी आपली पुरती फिटली निशा ।
केली पहिल्याहून चढी उतरला डोळ्यावरला नशा ।
एक जोडी पर दैव दर्शवें, लाजा उडवी परकुशा ।"
(बुध्द नार..... पा.नं. ९६)

अशा छोटया कथाकथातून ग्रामीण भागात घडणाऱ्या वास्तव गोष्टींचे चित्रण परशरामानी केले आहे. वरील लावणीतील स्त्रीचे व्यक्तीचित्रण उत्कृष्टरित्या चित्रित केले आहे. ग्रामीण भागात कुटुंबात घडणारा वास्तव प्रसंग परशरामानी रेखाटला आहे. ही लावणी म्हणजे समाजातील पुरुषाना एक प्रकारचा उपदेश केला आहे. समाजात त्या काळात घडणारे चित्रण परशराम आपल्या लावणीमध्ये एखाद्या कथेसारखे सांगतात. या लावणीतून त्याची निवेदन करण्याची पध्दत उत्कृष्टरित्या साधली आहे.

परशराम आपल्या अनेक लावण्यामध्ये स्त्री मनाच्या कोंडमाऱ्याचे त्याच्या दु:खाचे, सवती-सवतीच्या भांडणाचे वर्णन त्यानी उत्कृष्टरित्या केले आहे. या दु:खाच्या वर्णनाबरोबर स्त्रीच्या आनंदाचे क्षण ही परशराम चित्रित करतात.

आपल्या पतीने दुसरे लग्न करु नये, दुसऱ्या स्त्रीकडे जाऊ नये म्हणून ती दक्ष असे पण स्त्रीच्या पेक्षा पुरुषाची जात वेगळी आहे. राजापासून रंकापर्यंत लोक एकपत्नीत्वाच्या भावनेने राहिलेले नाहीत. पुरुषाच्या ज्या नाटकशाळा आहेत त्या नाटकशाळांना स्त्रीयां कंटाळल्या होत्या. अशा पतीत व व्यथीत झालेल्या स्त्रीयांची अनेक चित्रे "नारीला आणिला पती दोघीनी""एकुणेरीला उणे बोलती" इत्यादी लावण्यामध्ये चित्रित केले आहेत.

लावणी म्हणजे तत्कालीन स्त्री पुरूषाचा मनाचा आरसा आहे. शाहीर परशरामानी लावणीच्या अंतरंगातून अनेक स्त्रियांच्या अंतरंगाचा ठाव घेतलेला आहे. त्यांच्या भाव भावनाना वेदनांना बोलके केलेले आहे. परशरामानी ज्या प्रमाणे नवरा बायकोचे भांडण रेखाटले आहे. त्याचप्रमाणे सवती-सवतीचे भांडण हा ही लावणीचा विषय आहे.

त्याची "हरिस आणिला पती दोघींनी" या लावणीमध्ये दोन बायकांच्या दादल्याचे चित्रण केले आहे. हे चित्रण वास्तववादी आहे. आज ही समाजात घडत आहे. तत्कालीन समाजाच्या घराघरातील सवतीच्या रूपाने दिसणारे चित्रण परशरामानी रेखाटले आहे. समाजात घडणा-या लहान मोठ्या गोष्टीतून वाईट व चांगले कोणते हे त्यानी आपल्या कवनातून सांगितले आहे. दोन बायकांच्या दादल्याचा भांडणामध्ये ते म्हणतात,

"हारीस आणिला पती दोघींनी केला सळो कां पळो ।
सवतीचा प्रतिवाद नित्य विवाद लागला कळों ।"
(हारीस आणिला.... पा.नं. २४५)

परशरामाची याच विषयावर दुसरी महत्वपूर्ण ठरलेली लावणी म्हणजे, "ऐकुणोरीला उणे बोलती" या लावणीमध्ये काळी आणि गोरीचे भांडण रेखाटले आहे. काळी व गोरी या रंगवणीबद्दल लोकामध्ये आसणा-या गैर-समजुती त्यानी उत्कृष्टपध्दतीने रेखाटली आहेत. आपले तेवढे चांगले व दुस-याचे तेवढे वाईट किंवा खोटे ही लोकांची जी वृत्ती आहे त्या प्रवृत्तीचे चित्रण परशराम करतात,

"एकुणोरीला उणें बोलती एकोहून एक आगळी ।
आपआपल्या स्वरूपाला वाणिती गोरी आणि काळी ।"
(ऐकुणोरीला उणे.... पा.नं. ७०)

काळी व गोरीच्या दोन सवती आपल्या रंगाबद्दल अनेक दृष्टान्त या

लावणीमध्ये देतात. एकमेकीवर आरोप करतात. व आपण कसे श्रेष्ठ आहोत हे सिध्द करतात. या लावणीतून सामाजिक चालीरिती, रीतीरिवाज व सौंदर्यकल्पनाची सहज कल्पना येते. या लावणीमध्ये सवाल जबाब स्वरूपाचे निवेदन आहे.

परशरामानी आपल्या सामाजिक लावण्यामधून समाजामध्ये स्त्रीला जे स्थान होते त्याचप्रमाणे पुरुषालाही महत्वाचे स्थान होते. स्त्रियांप्रमाणे पुरुषाचीही चित्रणे परशरामानी रेखाटली आहेत. बायकोला वरवरची प्रीती दाखवणारा आपल्या नकली प्रीतीने तिला फसवू पाहणारा पुरुष "लष्कराचे काय सुख सांगू" या लावणीत चित्रीत केला आहे. त्याचबरोबर पत्नी निधनानंतर ढोंगी पतीच्या "सती जाण्याचे" चित्र परशरामाने आपल्या कवनामध्ये चित्रित केले आहे. अशा पध्दतीने पत्नी विरहामुळे व्याकुळ झालेल्या लफंगा फसवा पुरुष परशरामानी अनेक लावण्यामध्ये रेखाटला आहे.

परशरामानी आपल्या सामाजिक लावण्यातून समाजाला एक प्रकारचा उपदेश केला आहे. समाजातील अनिष्ट रूढी परंपरा दोष त्यानी लावणीमध्ये रेखाटले आहेत. अशा या सामाजिक लावणीने समाजाला काय शिकवले हे डॉ. गं.ना. मोरजे आपल्या ग्रंथामध्ये सांगतात,

"समाजात कसे वागावे याचे सुरेख चित्रण रेखाटले आहे. त्याच समाजाचे निरीक्षण आणि अनुभव प्रामाणिकपणे तो मांडतो. प्रपंच सोडा असे तो म्हणत नाही. "उलट प्रपंचात परमार्थ करा" जीवनात हिनपणा पत्करण्यापेक्षा मऊ, अर्थ व शक्तीयुक्त वागणे, योग्य ठरते असे तो सांगतो. कुणाला काय म्हणून आपले काम करून घ्यावे हे सांगताना तो म्हणतो, दुष्टाला श्रेष्ठ, कृपणाला कर्ण, नामर्दाला मर्द, दुधड्याला, सुघड, चिपडीला सुंदर, अंधाला डोळस, कुणब्याला पाटील, बाप्याला शेट, वेश्येला पतिव्रता, निर्धनाला

कुबेर, दिवाळखोराला सालस, ओहळाला दर्या, बायकोला धरधनीन म्हणावे. जग हे प्रामाणिकपणाचे नाही इतकेच नव्हे तर असे मतलबाने वागणे हा कलीयुगाचा धर्म आहे. असे तो स्पष्ट सांगतो. आजही परशरामाच्या या चित्रात बदल झाला आहे असे कुणी शहाणा म्हणणार नाही." [५]

अशा पध्दतीने परशरामानी आपल्या सामाजिक लावण्यात सामाजिक जीवन मोठया वैविध्याने चित्रित केले आहे. त्यांच्या सामाजिक लावण्यातून उत्तरपेशवाई व ब्रिटीश सत्तेची सुरवातीचा काळ अशा जीवनाचा वेध त्याच्या लावणीने परिणामकारक रीतीने घेतलेला आहे. त्या काळातील स्त्री पुरुषाच्या मनाचे चालीरिती, अनिष्टप्रथा या गोष्टीचे बारकावे लावण्यातून सुक्ष्मपणे त्यानी रेखाटले आहे. परशरामाच्या सामाजिक लावण्या म्हणजे समाजाचा चालता बोलता चित्रपटच होय.

अन्य शाहिराच्यापेक्षा परशरामाच्या सामाजिक कवनात समाजाचे चित्र जास्त प्रमाणात येते. अन्य शाहिराच्यामध्ये प्रभाकर, होनाजीबाळा, राम-जोशी, या शाहिरानी बाजीराव पेशव्याच्या दरबारातीलच लावण्या रेखाटल्या आहेत. समाजाकडे त्यांनी कमी प्रमाणात लक्ष दिले. याउलट परशरामाची लावणी रचना "वाडीच्या" परिसरात झाली होती. त्यामुळे समाजमनाचे चित्रण इतर शाहिरांच्यापेक्षा परशरामाच्या कवनात जास्त-प्रमाणात जाणवते.

रामजोशी, होनाजीबाळा, प्रभाकर ह्या प्रमुख शाहिराच्या लावण्या पाहिल्यानंतर त्याच्या लावणीमध्ये ~~अश्लिलता~~ अश्लीलता व ग्राम्यता जास्त प्रमाणात जाणवते. त्याचबरोबर वरील शाहीर हे व्यसनयुक्त असल्यामूळे ते फक्त स्त्रियांची चित्रणे करु लागले. समाजातील लहानसहान गोष्टीकडे त्यानी पाहिले नाही. पण परशरामाने समाजात घडणारे अनेक प्रसंग वास्तववादी स्वरुपात रेखाटले आहेत. त्यामुळे परशरामाची सामाजिक कवने इतर

इतर शाहीरांच्यापेक्षा महत्वपूर्ण ठरली.आहेत. या कवनामधून त्यानी समाजाचे काही दोषही दाखवले आहेत व उपदेश ही केला आहे.

इतर शाहिराच्यापेक्षा परशरामाची "अध्यात्मशक्ती" वेगळी आहे. त्याने रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी इत्यादी ग्रंथाचा अभ्यास परशरामानी केला आहे. त्यामुळे संतानी समाजाचे कार्य करीत असताना, अभंग, ओवी, भारुडे व गौळणी या मार्फत समाजाला उपदेश केला. त्याच पध्दतीने परशरामानी आपल्या लावण्यातून केला आहे. इत्यादी अनेक घटकांनी परशरामाची सामाजिक लावणी महत्वपूर्ण ठरली आहे.

पौराणिक लावण्या :

मराठी शाहिरी वाङ्मयात पौराणिक काव्य जास्त प्रमाणात रचली आहेत. या शाहिरानी आपल्या लावण्यामध्ये महाभारत, रामायण, कृष्ण, सत्यभामा यांच्या जीवनातील पौराणिक कथा शाहिरानी लावणीच्या माध्यमातून सांगितल्या आहेत.

शाहिरानी लोकांचे मनोरंजन करण्यासाठी या पौराणिक लावण्या लोकांच्यासमोर ठेवल्या आहेत. शाहिरानी हे पौराणिक विषय कथाकथन पध्दतीने आपल्या लावणीत चित्रित केले आहेत. या पौराणिक विषयातून शाहिरानी समाजाला उपदेश केलेला पाहावयास मिळतो. विविध पौराणिक कथा शाहिरानी मनापासून चित्रित केल्या आहेत. पंडितानी रामायण, महाभारत, भागवत, यातील विविध कथा आपल्या आख्यान काव्यातून लोकांच्यासमोर ठेवल्या त्याचपध्दतीने शाहिराने देखील महाभारत रामायण, भागवत या काव्यातील मूळकथेत बदल न करता मूळ कथेला धरून शाहीर अशा गोष्टी वेल्हाळपणे आपल्या परीने खुलवून फुलवून सांगतात. या लावण्या मांडताना त्यामध्ये रचना, संवाद व नाटयात्मक मांडणी शाहिरानी उत्कृष्टपध्दतीने चित्रित केली आहे.

शाहीर परशरामानी ग्रामीण लोकांच्यामध्ये परिवर्तन करण्यासाठी त्याना उपदेश करण्यासाठी काही पौराणिक लावण्या रेखाटल्या आहेत. या पौराणिक लावण्यामध्ये इतर शाहिरांच्यापेक्षा विविधता वाटते. परशरामाची "परनार पटयाची धार" या पौराणिक लावणीमधून उपदेश केलेला पाहावयास मिळतो. हा उपदेश त्यानी अनेक पौराणिक दाखले देऊन केला आहे. या लावणीतून परस्त्री कशी मारक आहे हे पौराणिक दाखले देऊन स्पष्ट केले आहे. परनारीच्या घातकीपणाचे वर्णन करताना परशराम म्हणतात की, जेथे ब्रह्मादिक देव चुकले तेथे माणसाची काय कथा. परस्त्री-मूळे भल्या, भल्याना कसा बट्टा लागला आहे त्यामध्ये देवही चुकले नाहीत असे परशराम लावणीमध्ये वर्णन करतात.

"वैभव असून रावणें सीता नेली चोरून ।
त्याच्या कुळासहित परिवारें गेला तो मरून ।
द्रौपदी सभेसी आणितां केस धरून ।
गदाघाये घेतला प्राण भीमाने हरून ।
नारदें गोपी मागितली देवा विसरून ।
झाली नारदाची नारदी त्या पापे करून ।
परसंग असा बहुतांस प्रचित अनुभवा ।
ब्रह्मादिक चकले काय इतरांचा केवा ।"

(परनार पटयाची धार...पा.नं.१००)

पुढे परशराम याच लावणीत लोकांना उपदेश करताना म्हणतात, पतीव्रता स्त्रिया एकपत्निव्रत्याने वागणा-या लोकांना स्वर्ग मिळतो व ते इच्छामरणी होतात. स्वतःच्या पत्नीला माया लावून सुखाने व आनंदाने आपले जीवन जगावे असे परशराम सांगतात.

"एकपत्नी पुरुष पतिव्रता स्त्रिया घरोघरी ।
दोषाचा किंचित लेश असे तिळभरी ।
सई पुण्यपरायण राजे पृथ्वीवरी ।
त्रैलोकी करावे गमन सदा निर्धारी ।"

(परनार पटयाची धार ... पा.नं.१००)

तत्कालीन लोकजीवनाशी परशराम कमालीचे समरस झालेले आहेत. त्यामुळे त्यानी लोकजीवनातील अनेक विषयावर जिव्हाळ्याने कवने रचली आहेत. "सवतीचा झगडा" हा तत्कालीन कुटुंबातील विषय होता. या सवतीच्या भांडणामध्ये गौरी आणि गंगा पार्वती-शिव याना त्यानी मानवी रुप दिले आहे. सवतीच्या भांडणात पार्वती व गंगा याचा झगडा चित्रित केला आहे.

"दोघी सवती भांडती पति भंगड भुंगा ।
आपसांत वर्म बोलती गौरी आणि गंगा ।
पार्वती म्हणे गंगेला तूं पाट करणी ।
होशील अभंगी विष्णूच्या चरणीं ।
भुलविला शिव तूं कशी केलीस करणी ।
राखिली मस्तकी मजला चोरुनी ।

(दोघी सवतीभांडती... पा.नं.१३९)

पती ईश्वर मानून आपल्या जीवनात सुख मानणा-या स्त्रियांचे चित्रण पौराणिक दाखले देऊन परशराम उत्कृष्टरित्या करतात -

"पतिव्रत्येचो सत्ता महिमा जिचा देवावरी पहा ।
त्रैलोक्यामधी श्रेष्ठ निवडली अनुसया एक महा ।
तिन्ही देव तिने करुन बालकें पाळण्यांत म्हणे रहा ।
दत्त दिगंबर कुशी मज व्हावें सोडून दिले तेंव्हां ।"

(दुधी धुतल्या निर्दोष... पा.नं. ९८)

या लावणीमध्ये सती अनुसयाचे उदाहरण देऊन समाजाला त्यातून उपदेश केला आहे. या लावणीमध्ये निवेदन पध्दती उत्कृष्टरीत्या साधली आहे.

शाहीर परशरामाच्या "पौराणिक लावण्यात" सती सुलोचनेवर लिहिलेली लावणी महत्वाची आहे. या लावणीमध्ये जी कथा सांगितली आहे. ती महत्वाची आहे. रावणाचा मुलगा इंद्रजित यांच्याशी लक्ष्मणाचे घनघोर युध्द होते. त्यात इंद्रजित ठार होतो. परंतु त्याची पत्नी सुलोचना पतिव्रता असल्यामुळे रणांगणावर घडलेल्या दुःखद प्रसंगाची परीच कल्पना येते. तिला दृश्यचिन्हे जाणवतात. बघता बघता रणांगणात पडलेल्या पतीचा उजवा हात गगनमार्गाने येतो. आपल्या पतीचा आलेला तुटका हात पाहून तिला मरणप्राय यातना होतात. या सर्व गोष्टीचे जे नाटयात्मक वर्णन परशरामानी उत्कृष्टपध्दतीने केले आहे. त्याचबरोबर सती सुलोचनाचे व्यक्तिचित्रण उत्कृष्टपध्दतीने चित्रित केले आहे. आपल्या पतीवर सती सुलोचनाचा असणारा जीव या लावणीत परशराम स्पष्ट करतात.

"सौभाग्यमणी माझा । चमूसागरी विघटला ।
घाली उभ्या आंग धरणीवर केश कुरळी ।
मारली धुळी विखुरली पोत झाळझाळी ।
आदळली जशी करदळी की शोकानळी ।
सुमनकळी ना विगलित भूमेळी ।
आग लावा गें सदनांत होऊं घा होळी ।
जीव तळमळी मूर्च्छित पडे त्या वेळी ।"

(दशमुख लंकेशाची स्नुषा .... पा.नं.१३०)

मुर्च्छित पडल्यानंतर सुलोचनाला थोडया वेळाने तिला दासी सावध करतात. व तिच्यासमोर तिच्या पतीचा तुटून आलेला हात भूर्जपत्रावर रणांगणावर झालेली हकिकत लिहून देतो. त्या हकिकती प्रमाणे प्रभु

SHRI. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

रामचंद्रापासून ती आपल्या पतीचे शिर मागून घेते व पतीबरोबर सती जाते. अशाप्रकारे रामायणात मूळात अद्भूत रसाने रसरसलेली कथा येथे परशराम समरसून सांगितलेली आहे. करुणा व अद्भूत रसाचा उत्कृष्ट उगम या लावणीत साधलेला आहे.

पौराणिक शृंगारपट लावणीत पुरुष आक्रमक असतो. असे परशरामाच्या "चक्रपाणी नको धरु पाणी" या लावणीत चित्रित केला आहे. त्याचबरोबर राधेकृष्णोचा शृंगार ही करून येतो.

शाहीर परशराम यांच्या जवळ असणारी बहूश्रुतता त्याच्या "कशी सोन्याची लंका झाली" या लावणीत दिसते.

"कशी सोन्याची लंका झाली आयका । देवाची मूळ वार्ता ।
जुनाट कथेनें पाहून केली वाल्मिकानें कविता ।"
(कसी सोन्याची लंका .... पा.नं. ११५)

ही परशरामाची लावणी म्हणजे ~~अद्भूताची~~ अद्भूताची निर्मिती होय. त्याचबरोबर पौराणिक घटनांच्या ज्ञानाची माहिती आहे. ह्या सर्वसामान्य लोकांच्या ज्ञानामध्ये भर पडली आहे.

"कर्णास म्हणे शाब्बास देव श्रीहरी" या लावणीत एकदा श्रीकृष्ण कर्णास "शाब्बास" म्हणाला, हे ऐकुण अर्जुनास अचंबा वाटला, त्या अचंब्याचे निराकरण कृष्णाने कसे केले ते सांगताना परशराम म्हणतात -

"तेंव्हा उत्तर करी श्रीहरी ऐक अर्जुना ।
तुझ्या ध्वजस्तंभी मारुती अचल वीर जुना ।
यावर मी सारथी त्रैलोक्याचा राणा ।
जे न घडे ते मी घडवीन गुंतुन भक्तीगुणा ।

मूर्तिमंत हे वेद अश्वरथाला चारी ।
त्रिकांही मग दिव्य दिव्य करी । "

(कर्णास म्हणे शाबास .... पा.नं.११७)

या काव्यातून परशरामानी कर्णाबद्दल श्रीकृष्णाचे जे चांगले उद्गार काढले कारण अर्जुनाकडे मारुतीसारखा पराक्रमी वीर आहे. कृष्णासारखा सारथी आहे. प्रत्यक्षात चार वेद रथाचे घोडे आहेत. असा अर्जुनाने दिव्य पराक्रम केले तर आश्चर्य नाही. उलट श्रीकृष्ण सांगतो, कर्ण खरा पराक्रमी कारण युध्दाच्यावेळी त्यांच्या रथाचे चाक पृथ्वीने गिळले, शल्याने क्षणो-क्षणी त्याचा पाणउतार केला. कर्णदानशूर आहे. तेव्हा कर्णाला शाब्बास म्हणणे उचित होय,हेच. कथानक या लावणीतून परशरामानी चित्रित केले आहे.

परशरामानी आपल्या पौराणिक कथामधून लोकांचे मनोरंजन केलेले पाहावयास मिळते. त्याच्या पौराणिक लावण्यामध्ये वापरलेले संकेत कल्पना, अवास्तव गोष्टी महत्वपूर्ण ठरल्या आहेत. त्याच्या पौराणिक लावण्यामध्ये "पश्चिम वाहिनी गोदा", "रमारंगे श्रीरंग अंभो", "रावणाप्रती विनवनी सती", "राज्य स्थापिले पंडूसत्ता" या लावण्यातून परशरामानी पौराणिक दाखले देऊन लोकांचे मनोरंजन केले आहे.

परशरामाची अपल्या पौराणिक लावण्यामधून त्यांच्या कवित्वशक्तीचा अनुभव पाहावयास मिळतो. महाभारत, रामायण, भागवत इत्यादी कथा-काव्यातील गोष्टी घेऊन त्याच बरोबर समाजात आसणाऱ्या अनिष्ट रूढी नाहिशा करण्यासाठी त्यानी वरील पौराणिक दाखले उत्कृष्टरीत्या दिले आहेत. इतर शाहिराच्यापेक्षा परशरामाच्या पौराणिक लावण्या महत्व-पूर्ण ठरल्या आहेत. हे त्यांच्या पौराणिक कवनावरून कळते.

परशारामानी आपल्या लावण्यामध्ये जी पौराणिकता सांगितली आहे ती रामायण, महाभारत, भागवत या कथाकाव्यातील कथा घेऊन चित्रित केल्या आहेत. या कथा सांगत असताना त्याची बहुश्रुतता विद्वता इत्यादी गुणांची प्रचिती येते. या कथाकथनपर लावण्या परशारामानी सर्वसामान्य लोकांना सुग्रमनत अशा पध्दतीने कथन केल्या आहेत. कथाकथन करीत असताना अद्भुत करुण इत्यादी रसरंगाची निर्मिती त्यानी केली आहे. ग्रामीण भागातील दिसणारे वास्तववादी चित्र परशारामानी आपल्या पौराणिक लावण्यातून चित्रित केले आहे. पौराणिक लावण्याचे चित्रण करताना परशारामानी महाभारत, रामायण या काव्यातील कथा जरी घेतल्या तरी त्यामधून समाजाला त्यानी उपदेश केला आहे. त्याबरोबर या लावणीतील व्यक्तिचित्रे ही महत्वपूर्ण ठरली आहेत. उपमा, प्रतीके, रूपके ही महत्वपूर्णरित्या चित्रित केल्या आहेत. या कथा त्यानी बहुजन समाजासमोर म्हणून दाखवण्यासाठी असल्यामूळे त्यातील शब्दरचना साधी, सोपी व सरळ आहे. निवेदन करण्याची पध्दतीही उत्कृष्ट ठरली आहे.

शाहीर परशारामानी पौराणिक लावण्याचा विचार करताना संत व पंडितानी ज्या रामायण, महाभारतातील प्रतिकांचा वापर केला त्याचपध्दतीने परशारामाने देखील याच महाकाव्यातील काही कथा लोकांच्यासमोर ठेवल्या आहेत. या कथा निवडत असताना त्यानी पतीव्रतेचा कथा, परस्त्रीच्या नादामूळे होणारा विनाश असा कथा निवडल्या आहेत. कारण शाहीर परशारामाच्या काळातील लोकांच्यावर रामायण, महाभारत, भागवत या काव्यातील कथांचा प्रभाव पडलेला आहे. त्यामूळे याच काव्यातील कथा सांगून लोकांच्या मनामध्ये परिवर्तन करावयाचा मानस असावा असे दिसते.

परशारामाच्या पौराणिक लावण्यामधून "पतिव्रत्यावर भर जास्त प्रमाणात दिसत आहे. उदा. सती सुलोचनाची लावणी, सवतीचा झगडा"

या लावण्यातून यांचे दर्शन घडते. या स्वरूपाच्या लावण्या रेखाटून परशरामानी समाजामध्ये असणाऱ्या अनिष्ट प्रथा बंद पाडावयाच्या होत्या. परशराम हा पेशवाईचा शेवट व इंग्रजी राज्याची सुरवात या काळातील शाहीर आहे. या काळामध्ये बाजीराव पेशवाईच्या अनियंत्रीत राजेशाहीचा परिणाम त्यांच्यावर झाला असावा. बाजीराव पेशव्या - च्या दरबारी आसणाऱ्या स्त्रियांचा भरणा त्यामुळे त्याकाळातील स्त्रियांची अवस्था बिकट होती. बाजीराव पेशव्यांच्या दरबारी असणाऱ्या सेवकाला आपली पत्नि बाजीरावाकडे चावी लागत असे. त्यामुळे जसा राजा, वागत होता तशी प्रजा ही वागत होती. त्यामुळे पतीव्रता ही नष्ट पावली होती. त्यामुळे समाजात ही अनिष्ट प्रथा बंद पडावी यासाठी परशरामानी या पौराणिक लावण्यामधून पतिव्रत्या स्त्रिची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत.

अशा पध्दतीने इतर शाहिरांच्यापेक्षा वेगळा ठसा उमटविणारा शाहीर परशराम यांच्या पौराणिक लावण्या महत्वपूर्ण ठरल्या आहेत.

## ईश्वरवर्णनपर लावण्या :

शाहीर परशरामाने ज्या प्रमाणे पौराणिक, आध्यात्मिक व स सामाजिक लावण्या लिहिल्या आहेत त्याचप्रमाणे ईश्वरवर्णनपर लावण्याही महत्वपूर्ण ठरल्या आहेत. पौराणिक लावण्यामधून ज्याप्रमाणे उपदेश केला आहे त्याचप्रमाणे ईश्वरवर्णनपर लावण्यातही समाजाला त्यानी उपदेश केला आहे. परशरामाच्या ईश्वरवर्णनपर लावणीत श्रीकृष्ण, राम, शंकर, गणपती, इत्यादी देवांदिकावर लावण्या चित्रित केल्या आहेत.

लावणीचे तमाशामध्ये रूपांतर आले. तमाशाला सुरवात करताना गणाची लावणी, गवळण, देवस्तुतीवर, संतस्तुतीवर, शृंगारिक कथाकथनपर भेदिक, मुजरा अशा लावण्या म्हटल्या जातात. शाहीर कोणत्याही

संप्रदायाचा असो, प्रारंभी गणेशस्तवन, म्हणजे गणाची लावणी म्हणून आपल्या कार्यक्रमाला सुरवात करण्याची त्याची पध्दत असे. कदाचित हे परंपरेने चालत आलेले असावे किंवासंताच्या किंवा पंडितांच्या अनुकरणातून आले असावे.

गणेशस्तुतीपर गणाच्या लावणीत परशराम गणपतीला कार्यक्रमाचे सुरवातीला आवाहन करीत असताना म्हणतो,

"गणाधी गणपती गणेशा तुज नमो सद्गुणदाता ।
धावत झडकरि येई माझा रंग राख आता ।।
अनंत रूप अनंत अवतार अनंत तुझे गुण गाती ।
ब्रह्मादिकांही पार कळेना इतरांची मग काय गती ।
एक्यांशी कोटी सवा लक्ष दश सेवक तव गणपती ।"

(गणाधी गणपती गणेशा ..पा.नं.५६)

या लावणीत गणपतीबद्दल असणारा आदर परशराम रेखाटतात. गणेश पूर्णपणे आनंदाचा कंद आहे. सूत्रधार सर्वांचा आहे. तो कैवल्याचा दाता आहे. निर्गुणांचा सगुण होऊन या जागात अवतरला आहे.

परशरामाची गणेश वर्णन करणारी दुसरी लावणी "जय सिध्दी-विनायक देवा" या लावणीत परशरामाना ओंकाराच्या स्वरूपात गणेश दिसतो, विठ्ठलाच्या स्वरूपात दिसतो, अशा विविध स्वरूपात गणपतीला मनात चिंतून हात जोडून प्रार्थना करतो.

"जय सिध्दीविनायक देवा । ओंकार नमूं आदिपुरूषा ।
जेव्हां कांहींच नव्हते सार । होते निरगुण निराकार ।
स्वइच्छा शून्याकार । शून्यापून ध्वनी ओंकार ।
ते मूळ मायेचें घर । मायेपून त्रिगुणाकार ।"

("जय सिध्दीविनायक देवा ... पा.नं.५७)

श्री राम व श्रीकृष्ण ही शाहिराची आवडती दैवते आहेत. या देवतावर शाहीर परशरामाचे वर्णन केले आहे. कृष्णभक्तीवर लावणीत श्रीकृष्णाचे स्वभावचित्र उत्कृष्टपद्धतीने चित्रित केले आहे. कृष्णाबरोबर राधेचेही वर्णन उत्कृष्टपद्धतीने करतात. श्रीकृष्णाचे बालपणाचे वर्णन "नारी तीळ स्त्रीकळ" या लावणीत करतात.

"विधी करी ध्यान । नारी स्वरूपाशीं वान ।
त्रैलोकीं निधान । ते अवतरले गोकुळीं ।
बहुतप्रकारे रिझवी माता । पिता नंद गोवळी ।
दधी ठेवी पुढें । हरी फुंदु फुंदु रडे ।
माय घेती कडे । तव अधिकच रडे वनमाळी ।
घरांत नेतें बाहेर आणिते । गाती स्वर मंजुळी ।"
(नारीं तीळ रतीकळ.. पा.नं. ५८)

या लावणीत बालकृष्णाप्रमाणे राधेचही चित्रण महत्वपूर्णरित्या परशराम रेखाटतात -

"नारीं तीळ रतीकळ । तुझी कळा अकळ ।
तू निर्मळ ब्रह्मचारी । अनंत माया शेष वर्णिता दुभांगली वैखरी ।
राधा नार उभी द्वारी । जसे लावण्याची कळी ।
हासें गदगदा हरी । राधिका अनतमुख प्रक्षाळी ।
बोले यशावदा सुंदरी । राधेची विनंती करी ।"
(नारी तीळ रतीकळ... पा.नं.५८)

शाहीर परशरामानी बाल कृष्णाचे वर्णन करणारी आणखी एक लावणी चित्रित केली आहे. ही लावणी होनाजी बाळाच्या "अमर-भुपाळीसी" तिचे साम्य आहे. पण होनाजीच्या भुपाळीतील उत्कंटता या लावणीत येऊ शकलेली नाही. दोन्ही लावण्यातील वेळ सारखीच आहे.

आणि दोघांच्याही कवनात श्रीकृष्णाचीच स्तुती केली आहे. या भुपाळीचा मुख्य आशय श्रीकृष्ण स्तुती कृष्णाला आळवणे हा आहे. श्रीकृष्ण आपल्या भुपाळीत म्हणतो,

"उठ झाला प्रात: काल तुझे गोपाळ झाले धननीळा ।
पूर्वदिशे उदयला भानू आला उदयाचळा । "
(उठ झाला प्रात:काल..पा.नं. ५१)

या लावणीत प्रात: काळाचे वर्णन ही महत्वपूर्ण ठरले आहे. या लावणीत प्रात:कालाचे वर्णन करताना परशाराम म्हणतात,

"मंथनास प्रारंभिती गोपी घरोघर त्या गोकुळी ।
सडासंमार्जन करुन घालिती रंगमाळा रांगोळी ।
कनकाचे घट शिरीं यमुना तिरीं जाती आणू जळा ।"
(उठ झाला प्रात:काळ.. पा.नं.५१)

परमेश्वराच्या दशावताराचे वर्णन ही सर्व शाहिरांच्या रचनेत येते. परशाराम ही आपल्या "~~स्मी~~, ~~स्मी~~ रमी रक्मी रे करुणाघन ।" या लावणीत विष्णुंच्या दशावताराचे वर्णन करतो. यात मत्स, कच्छ, वराह, नरसिंह, वामन, इत्यादी जे परमेश्वराने अवतार घेतले आहेत त्याचे वर्णन केले आहे.

"वंदु - वंदु त्या आदि निर्गुणा जी" या लावणीत वरील लावणीतील अवतार स्पष्ट केले आहेत -

"शंखासुराने वेद नेले देवे मत्स्यरुप धरिले जी ।
केशवाने समुद्र मथिला जी माधवा धरणीधर कृष्ण माधवाजी ।
वराहरुप तुझे हिरण्याक्ष मर्दना जी ।
(वंदु-वंदु ... पा.नं.६४)

शाहीर परशरामाची जी विठ्ठलावर भक्ती आहे त्या भक्तीचे वर्णन परशराम आपल्या अनेक लावण्यात करतात. परशराम वृत्तीने भाविक व नम्र होता. परमेश्वराच्या ठिकाणी लिन होता. आपली लावणी रचना ही परमेश्वरासाठीच निर्माण झाली आहे हे सांगताना ते म्हणतात, "आपली लावणी, रचना वा तमाशा केवळ उदर भरण्यासाठी उभारलेल्या धंदा नाही. गायनाने परमेश्वरास आळवावे ही मनाची आवड आहे. त्या प्रेरणेतूनच आपली लावणी रचना होत आहे. केवळ चैन मजा लाभावी म्हणून कवनरचना वा गायन नसून परमेश्वर गुण गावे हेच आमचे स्वधर्म होय. तेच आम्ही करीत आहोत." अशी परशरामाने स्वच्छ कबुली दिली आहे. आपल्या काव्याबद्दलचे उद्गार शाहीर पराशराम "दूर कर पैसाखोटा" या लावणीत काढतात.

"कर्मधर्म तो हरीच अवघा । विठू म्हणाला गा पायी ।
गुरुविणा कृपा कोण दाखवी । परशराम अज्ञान कवी । "
(दुर कर पैसा खोटा कलती... पान.९९)

शाहीर परशरामाची देवाला शरण जाण्याची, संताच्या संग साधण्याची विनम्रवृत्ती तत्कालीन समाजरचनेच उठावदार झाली आहे. व त्यामूळे परशरामाला लोकप्रियता मिळाली आहे.

रामनामाचे महात्म एका लावणीमध्ये परशरामाने चित्रित केले आहे. "भजा राम लक्ष्मण जानकीस्वामी" या लावणीत राम, लक्ष्मण अयोध्येतील दशरथ व कौशल्याच्या पोटी जन्मले आहेत यांचे वर्णन परशराम करताना म्हणतात,

"भजा राम लक्ष्मण जानकीस्वामी रघुवीर पंचवटी ।
जप तप साधनश्रेष्ठी मुनी करिती अनुष्ठान गंगेच्या तटी ।
धन्य भाग्य दशरथाचे सुर्यवंशी श्रीराम ।
गुण गाती कौसल्या स्तवी पालखांत मेघश्याम ।"
("भजा राम लक्ष्मण जानकीस्वामी..पा.नं.४३)

पंढरपूरचा विठोबा ही महाराष्ट्रातील लोकांची प्रिय देवता परशरामाचे अंतिम सुख विठ्ठलाच्या पायी, त्या विठ्ठलाची स्तुती अनेक लावण्यात परशराम करतात. "साक्षात देव पंढरी दिगांबर मूर्ती" या लावणीत परशरामानी विठ्ठलाची स्तुती केली आहे. त्याच बरोबर "श्रमलास फार जगजेठी" या लावणीत विठ्ठलाने घेतलेल्या श्रमाचे वर्णन परशराम करतात,

"श्रमलास फार जगजेठी । बारे विटेवरी उभा कर कटीं ।
दधि समुद्र मंथिला जेव्हां । शेषाचा दोर् लाविला तेव्हां ।
दिले अमृत वाटून जेव्हां । राहु चंद्राचा तधीपुन दावा ।
दहा गर्भ अंबरुषीसाठीं । घेऊन लावी चक्र दैत्यापाठीं ।
(श्रमलास फार जगजेठी ... पा.नं.९८)

या लावणीत विठ्ठलाने केलेले कार्याचे वर्णन परशरामाने केले आहे. ते विठ्ठलाला म्हणतात, तुच विष्णू, कृष्ण आहेस गोपीकांच्याबरोबर तूच खेळलास, रावणाचा वध केलास, तु देव, भक्त आणि क्षेत्र या तिन्ही गोष्टी पंढरपूर क्षेत्रामध्ये एकत्र आणल्यास तुझ्यासाठी आषाढी कार्तिकी चंद्रभागेच्या वाळवंटात गर्दी होते असे विविध अंगानी विठ्ठलाची स्तुती केली आहे.

पंढरपूरचा विठ्ठल लोकांचा आवडता का झाला यांचे वर्णन "साक्षात देव पंढरी दिगंबर मूर्ती" या लावणीत करतात. या लावणीमध्ये पुंडलिक, हिरण्यकश्यपू, रामचंद्र अवतार, कृष्ण अवतार ज्ञानेश्वराकरवी रेडयाच्या मुखातून वेद वदविले, एकनाथाच्या घरी बारा वर्षे पाणी वाहिले. तुकारामाच्या वह्या तारल्या, चोथल्याचे शेत पिकवले, गोरा कुंभाराचे बाळ वाचविले. या सर्व गोष्टी विठ्ठलाने तारल्या आहेत. त्यामुळे लोकांचा आवडता झाला आहे. सर्वसामान्याचा पिता झाला आहे.

त्यानंतर परशरामानी "कला अचळ करणार धन्यता तार" "कोण आला रथवाला", "पार्वती पुसे सुण अंतरीची" इत्यादी लावण्यातून परशरामानी ईश्वरवर्णन केले आहे.

परशरामाच्या देवतावर्णनपर लावण्यात ईश्वराने जे कार्य केले आहे सर्वसामान्य लोकांना तारले आहे. त्यादेवतांची स्तुती केली आहे. या देवतामध्ये विठ्ठल, कृष्ण, राम या देवताची वर्णने केली आहेत. लोकांना किंवा आपल्या भक्तांना तारण्यासाठी त्यानी जे अवतार घेतले त्या अवताराचे वर्णन परशराम करतात. इतर शाहिरांच्यापेक्षा परशरामानी केलेली देवता वर्णने महत्वपूर्ण ठरली आहेत.

परशरामाच्या इतर लावण्या :

परशरामानी आपल्या शृंगारिक लावण्या आध्यात्मिक लावण्या, सामाजिक लावण्या, ईश्वरवर्णनपर लावण्या, पौराणिक लावण्या, समाजापुढे ठेवून त्या महत्वपूर्ण ठरल्या आहेत. वरील लावण्यांची माहिती पाहत असताना त्याचा सर्वांगानी विचार आपण केला आहे. वरील लावण्या व्यतिरिक्त परशरामाने इतर काही लावण्या थोड्याप्रमाणात लिहिल्या आहेत. त्यामध्ये अन्य कथाकथनपर लावण्या, उपदेशपर लावण्या, विनोदी लावण्या, हिंदी लावण्या, असे वर्गीकरण करता येईल. या लावण्या त्याच्या महत्वाच्या बनल्या आहेत. त्याचा क्रमाने अभ्यास करु.

अन्य कथाकथनपर लावण्या :

शाहीर परशरामाच्या पौराणिक लावण्या पाहत असताना त्यामध्ये परशरामानी रामायण, महाभारत व भागवत या कथा काव्यातील कथा सांगितल्या आहेत. या कथाकथानपर लावण्यात शृंगाराचे वर्णन करुन कथा कोणत्या पध्दतीने सांगितल्या आहेत ते पाहावयाचे आहे.

लोकांचे मनोरंजन करणे हा शाहिराचा मुख्य हेतू होता. प्रारंभी-च्याकाळामध्ये तमाशामध्ये का सादर करण्याची पध्दत नव्हती. त्यामुळे लावण्यातूनच कथा सांगितल्या जात होत्या. या कथा पुराणकथाचा आधार घेऊन सांगितलेल्या आहेत.

कथाकथनपर लावण्यातील त्याची महत्वाची लावणी म्हणजे "अजब शहर गुलजार" या लावणीमधील बटाउ व मोहनाचे पाणवठयावर प्रेम असते. मोहनाराणीचा नवरा प्रवासाला गेलेला असतो. ती बटाऊला आपल्या घरी घेऊन येते. इतक्यात तिचा नवरा प्रवासाहून येतो. तिला बटाऊबद्दल कोण म्हणून विचारतो. ती तो मामोभाऊ असल्याचे सांगते. नवरा बटाऊला ठार मारतो. मोहना बटाऊच्या प्रेमापाई त्यांच्या बरोबर मरून जाते. या लावणीत परशराम कथेच्या आध्यात्मातून प्रेमाची जाणीव करून देतात या लावणीत उपदेशाची झालर आहे. नाटय ओघवते, निवेदन व अभिनय आकर्षक वाटतो. ते खालील कडव्यावरून कळते.

"अजब शहर गुलजार । बटाव दिल्लीचे राहणार ।
अहमदाबादेमध्यें एक नार । मोहनाराणी ।
प्रीत दोहींची कशी घ्या ऐकुनी ।"

(अजब शहर गुलजार ... पा.नं.१०८)

परशरामाच्या कथाकथनपर लावणीमधील "खर्चून पैका" दोघी बायका केल्या सुखासाठी" या लावणीत परशराम दोन बायका केल्यानंतर जी पुरुषाची अवस्था होती ती कथेच्याद्वारे परशराम लोकंच्यासमोर ठेवतात.

"खर्चून पैका दोघी बायका केल्या सुखासाठी ।
सुख नाही पर दुःख झालेले नित्य आमच्यापाठी ।"

(खर्चून पैका ---पा.न १२२)

"बायकोस आवडवी दादल्या" या कथाकथनपर लावणीत परशराम एका सती जाणा-या पुरुषाचे चित्रण केले आहे. पत्निच्या निधनानंतर आपण सती जाऊ असा म्हणणारा पुरुष "सता" जात नाही. या लावणीतून लबाड ढोंगी पुरुषाचे चित्रण परशरामानी केले आहे.

सवती सवतीच्या भांडणामध्ये होणारी पतीची अवस्था परशरामानी "सवती ग सवती नित्य भांडती, नाही कोणाचा कमजोर" या लावणीत चित्रित केली आहे.

"सवती ग सवती नित्य भांडती नाही कोणाचा कमजोरा ।
पती पांगळा करुन बसविला अमंद नारी शिरजोरा ।"
(सवती ग सवती .... पा.नं. १५८)

एखाद्याच्या अंगी सामर्थ्य नसताना भलत्याच गोष्टीचे अनुकरण करायला गेले तर काय फटफजिती होते. त्याचे "वर्णन""देह गेला तर जावो" या लावणीत परशराम करतात.

एकामागुन एक सुख सख्यासख्जी मिळायला लागल्यावर माणसाची जी अवस्था होते ते ओवघवत्या भाषेत उपरोध व विनोदाच्या साह्याने परशराम "चैत्रमास ऐन उन्हाळा चार कोस, न मिळे वस्ती" या लावणीत विनोदाच्या माध्यमातुन रेखाटतात.

शाहीर परशरामाने "पतिव्रता खुणा करुन पतीला" या लावणीत पतीने आपल्या पतीव्रता स्त्रीला चार अटी घातल्या व परदेशी गेला. तिने चारीही अटी किती चातुर्याने व कौशल्याने पार पाडल्या ते मोठया अद्भूतरम्यरीत्या परशरामानी चित्रित केले आहे.

अशा पध्दतीने परशरामानी आपल्या कथाकथनात्मक लावण्यांमधून ग्रामीण जीवनातील संसारातील वास्तववादी चित्रे रेखाटली आहेत. त्यांच्या

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

इतर कथाकथनपर लावणीमध्ये "कोणी विरळा, एकदा राहिला" न कळता पडली चुकी" पतीने मजवर वरचढ केला', 'पाश्चिमवाहिनी गोदा प्रती मूळ गंगा' इत्यादी लावण्या आहेत. या सर्व लावण्या कथेमूळ महत्वपूर्ण ठरल्या आहेत.

<u>उपदेशपर लावण्या :</u>

शाहीर परशरामाच्या उपदेशपर लावण्यातून त्यानी समाजाला जो उपदेश केला त्याची माहिती मिळते. या उपदेशपर लावण्यामध्ये "चलतीमूळे का भलतेच करिशी" जर मतलब करणे, जराविण जगि जरण असेना, जुने डोळे नवे तमाशे, त्रिगुणाचे तीनपण केले, दुरकर पैसा खोटा चलनी" पुत्र असावा सुपुत्र ज्याचे, सुई दो-याला त्यात असो ग्रो, सोनार शिक्का नवा निघाला' इत्यादी लावण्या येतात.

परशराम ग्रामीण जीवनात समरस झालेला शाहीर होता. समाजातील अनेक गुण दोष त्याने जाणले होते. लोकांच्यामध्ये जे अवगुण होते ते नाहीसे करण्यासाठी लोकांच्यामध्ये परिवर्तन करण्यासाठी उपदेशपर लावण्या रचल्या आहेत.

माणसाला नवीन गोष्टीचा सोस असतो. त्यासाठी तो नव्या, नव्या गोष्टीत मग्न होतो. पण ही नावीन्यता क्षणभंगुर असते हेत्याला माहित नसते. अशा मानवी जीवनाचे वर्णन "जुने डोळे नवे तमाशे" या लावणीत करतात.

"करु नये ते भलतेच करिती नव्या नवतिच्या बळे ।
उतार वयांत पदरी पडतील फळे ।
जंवर मुखावर लाली तोंवर पुसतील हैडे गोळे ।
चल नको भाजु परांवर फुले ।
धनदौलत जरी पदरीं असली पाण्यावाणी पळे ।
मेळवितां सायासी ना मिळे ।

सुकृत सरल्या कोण पुसले मग होसिल हिंवा गार ।"

(जुने डोळे नवे तमाशे... पा.नं. ९१)

"त्रिगुणाचे तीनपण केले" या लावणीत आपण जीवनामध्ये आपण आयुष्यभर काहीच केले नाही. या जाणिवेने संत पावणा-याला उपदेश उपदेश करतात. याच लावणीत म्हातारपणाचे चित्र रेखाटताना त्याची लेखणी बहरते -

"साठ सत्तर वर्ष झाली आली उतरती कळा ।
श्याम केस सफेद झाले मंद दिसते डोळां ।
दंत भग्न झाले मुखाची लाळ गळे भळभळा ।
कोण कोठून आले म्हणून पुसतसे हात लाऊन निळा । "

(त्रिगुणांचे तीनपण केले... पा.नं. ९३)

"दुधड मार नव-याला शिकवी" या लावणीत ग्रामीण जीवनातील वास्तवतेचे चित्रण परशाराम करतात. परशाराम जे समाजजीवन अवती भोवती पाहतो, कौटुंबिक जीवनातील चढउतार त्याला दिसतात ते लावणीत चित्रित करतात. एक दुष्टी स्त्री आपल्या नव-याला संयुक्त कुटुंबातून वेगळे निघण्यास भाग पाडते. आपण तरुण रक्ताच्या उत्साहाने चांगला संसार करुन दाखवित असे. नव-याचे काम भरते, पण तिच्या सांगण्यावरुन संसाराची दैनीय अवस्था झाली. शेवटी पुरुषाला कळून चुकते व तो आपल्या भावाची माफी मागतो. या लावणीतील स्त्री बुध्दी नाशाकडे जाणारी आहे. या भारतीय समजुतीचे समर्थन करणारी ही विचारसरणी आपल्या लावण्यातून परशाराम उत्कृष्ट-पध्दतीने मांडली आहे.

परस्त्रीशी संबंध ठेवणे कसे अनिष्ट आहे हे "परनार पट्याची याद" या लावणीत चित्रित करतात. तर पुत्र कसा असावा हे "पुत्र असावा सुपुत्र ज्याचे" या लावणीत रेखाटतात.

"पुत्र असावा सुपुत्र ज्याचे जन काढी अवघे गुण घेती ।
काय कामाचे दहावीस असले अभिमानामधी धूळ माती ।
पुत्र असावा शुकस्वामी सारखा हरीला भजनी अहोरात्री ।
निस्तुक नसतां वंश बुडता तसा नसावा कुपात्री ।"
(पुत्र असावा सुपुत्र ... पा.नं.१०१)

"सई दो-याला हयात असो या" या लावणीमध्ये परशरामाने स्वत:चे जीवनविषयक तत्वज्ञान सांगितले आहे. आपला हा जो तमाशाचा धंदा करीत आहोत तो पैसा मिळवण्यासाठी न करता तो हरिनामाच्या भक्तीसाठी करीत आहोत.

"पोट भराया उभारिला ना तमाशाचा धंदा ।
महाल मोकासे जहरी कळसे करितील आपुला बंदा ।
रुची मनाची गायन करुनी आळवावे गोविंदा ।
चैनी खातर आम्ही राया पडलो नाही या फंदा ।
कर्म आमुचे हरिगुण गाणे नाम न विकरी परिसा ।"
(सुई-दो-याला हयात ... पा.नं. १०४)

परशरामानी उपदेशपर लावणी अनुभवातून निर्माण झाली आहे. त्यामुळे ती वाचत किंवा ऐकत असताना ह्दयाला जाऊन भिडते. परशरामानी समाजाला उपदेश करताना ग्रामीण जीवनातील लहान मोठया घटनाचे चित्रण परशराम आपल्या लावणीत करतात. इतर शाहिरांच्यापेक्षा परशरामानी जो उपदेश केला आहे तो महत्वपूर्ण आहे. कारण परशराम संत ही होता व शाहीर ही होता. त्यामुळे उपदेशपर लावण्या. लोकांना महत्वाच्या वाटू लागल्या.

परशरामाच्या उपदेशपर लावण्याबद्दल डॉ. गं.ना. मोरजे आपल्या "शाहीर वरदी परशराम" या ग्रंथात म्हणतात,

"परशरामाने संताच्या रचनेच्या अनुकरणातून केलेले एक लक्षणीय आहे. सुमनीरूपी सुईच्या विवेकरूपी वेल्यातून नितकर्माचा धागा ओवित राहावे. परशरामाच्या जीवनाचे जे तत्वज्ञान होते त्यानुसार ते एक सुसंवादी आहे. परशरामाने सर्वत्र नाममहिमा सांगितलेला आहे. विरक्ती संन्यास परशराम सांगत नाही. "सावधान व्हा"असेही सांगत नाही. हे जीवन जगत असता नीतीमान चारित्र्यसंपन्न असावे असा त्याचा सामान्याला पटणारा मानक उपदेश आहे. मानवी जीवन क्षणभंगूर आहे. अनेक योनीतून माणसाला जावे लागते आणि या सर्वांवर मात करण्याचा परशुरामाच्या दृष्टीने एकमेव उपाय म्हणजे "अभेदभावे नाम वदावे हात वाजवून या टाळी । अनंत जन्माची पापे अर्धनिमिषामध्ये होळी । परशरामाचे चरित्र शुध्द होते. तो निर्व्यसनी होता. त्याने केलेला उपदेश सांगण्यास सोपा पण वागण्यास कठीण असा नव्हता. तसेच दुसऱ्या सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडे पाषाण या कोटीतील नव्हता. कित्येकदा रचनेत पाल्हाळ दुरान्वय येतो पण ज्या ओव्यासाठी ते लिहिले आहे. त्यांचा विचार करता क्षम्य म्हणावा लागेल." [६]

अशा पध्दतीने शाहीर परशरामानी आपल्या उपदेशपर लावण्यातून वास्तववादी समाजाला योग्य वाटणारा उपदेश सांगितला आहे. त्यामुळे त्यांच्या उपदेशपर लावण्यानी सर्व महाराष्ट्राला मोहीत केले आहे.

### ३) परशरामाच्या विनोदी लावण्या :

शाहीर परशरामाच्या विनोदी लावण्या इतर शाहिरांच्यापेक्षा वेगळ्या स्वरूपाच्या आहेत. परशरामानी आपल्या विनोदी लावण्यातून स्त्री-प्रमाणे पुरूषावरही उपरोधाने विनोद करीत आहेत. परशरामानी आपल्या विनोदी लावण्यातून जे समाजाचे चित्रण केले आहे त्यामध्ये मानवी जीवनातील व समाजातील दोष त्यांनी दाखवून दिले आहेत.

"लष्कराचे काय सुख सांगू" या लावणीत प्रासंगिक पण निखळ विनोदाचे चित्र परशराम रेखाटतात. या लावणीतील ढोंगी लबाड शिपाई आपण लष्करामध्ये मोठे कार्य कसे केले हे खोटे आपल्या पत्नीला सांगतो.

"बक्षिसा मिळविल्या ववरीस अबदागिर ।
दौलत मिळविली भर उंट दोन चार ।"

(लष्कराचे काय सुख... पा.नं.१५६)

अशी थाप मारल्यानंतर मी तुझ्या आठवणीने आलो आहे. वाटेत मला चोरानी लुटले त्यामुळे मी बेकार झालो आहे. नंतर ती स्त्री आपल्या माहेरी वडिलांच्याकडे पतीला घेऊन जाते तिथे त्याची ऐषआराम होते. ही ऐषआराम चालली असताना तो आपल्या पत्नीला पुन्हा फसवतो. त्याच्या डोक्याला टक्कल पडलेली असते त्याकेळी हा पती उत्तर देतो. पण त्याच्या उत्तराचे बिंग फुटते व सर्व ख-या गोष्टी बाहेर पडतात.

"माथ्याला टक्कल पडलें मोळी वाहतां ।
खांद्याला पडले घट्टे बादले वहातां ।
बादल्याची मोडली काठी याचे हातां ।
याला सकाळींच उठून मारती लाता ।"

(लष्कराचे काय सुख... पा.नं. १५८)

या लावणीचा शेवट महत्वपूर्णरित्या करुन लोकांना हसविण्याचे काम परशराम करतात. हा जो पोशाख घालून जी व्यक्ती आली होती तो पोशाख त्याने चोरुन आणली होती असा शेवट करतात. परशरामाच्या विनोदी लावण्यातून विनोदी कथाभाग निवेदन पध्दतीने सांगण्याची पध्दत महत्वपूर्ण आहे. विनोदी कथा ओघवत्या भाषेत परशराम सांगतात. तत्कालीन समाजजीवनातील कच्चे दुवे हुडकून विनोदाच्या हत्याराने परशराम लोकांच्यासमोर ठेवतात. परशरामानी ज्या विनोदी लावण्या चित्रित केल्या आहेत

त्या लावण्यांचे विषय हे ग्रामीण भागातीलच आहेत. या विनोदातून समाजातील दोष दाखवून देण्याचे काम परशाराम करतात.

या लावणीबरोबर परशारामाच्या "बायकोस आवडवी दादल्या" या लावणीत पत्नीसी खोटा वागणारा पती विनोदाच्या माध्यमातून रंगविला आहे. या लावणीमधील पुरुष आपल्या बायकोला सांगतो.

"बायकोस आवडवी दादल्या तूं मरशील मी सता निधन ।
जीव गेला तो जाऊं दे नारी केला नेम ना कधी भ्रान ।"
("बायकोस आवडवी दादल्या.. पा.नं. १४९)

या लावणीतील बायकोही हुशार रंगविली आहे. ती नवरा आपल्या शब्दाला खरोखरच जागतो की नाही याची परीक्षा घ्यायला निघाली आहे. आपण मेल्याचे सोंग घेऊन पडली. नवरा मनात म्हणतो पुन्हा असली वस्तू मिळायची नाही. भोगून घ्यावी व उजाडल्यावर अग्नीसंस्कार करावे. या काळातील मानवी जीवनावर विनोदी पध्दतीने परशारामानी बोट ठेवले आहे. त्याकाळात समाजात पुरुषप्रधान समाज कोणत्या पध्दतीने वागत होता यांचे चित्रण लावणीतून परशाराम करतात.

"परशारामानी "खर्चून पैका दोघी बायका केल्या सुखासाठी" या लावणीत खर्च करुन दोन बायका केल्या सुखासाठी पण सुख न लागता दुःख लागले पाठी असे या लावणीतील पुरुष आपले मनोगत व्यक्त करीत आहे. बायकांचा भांडकुदळी स्वभाव त्याचा परिणाम परशाराम मोठया विनोदी पध्दतीने या लावणीत सांगत आहे. दोघींच्या भांडणात तिसऱ्याची जी दोडक्यावाणी अवस्था होते त्याचे चित्रण परशाराम विनोदाच्या माध्यमातून परशाराम करतात.

"धाकटी जपून वर होती । तिच्या शेंडी लागली हातीं ।
तिने ताणून धरला पती । दोघीजणी पडल्या चीति ।
असा दोडका लोंबू लागला झाला हिरमुष्ठी ।
दिवस उगवल्या सोडून दिल्हा जीव उरला कंठी ।"

(खर्डून पैका.... पा.नं. १२२)

परशरामानी "देह गेला तरी जावो" या लावणीत पतीव्रत्तेचे चित्र रेखाटले आहे. नव-याने हाक मारिली म्हणून एक पतिव्रता धान्य कांडता, कांडता वरच्यावर मुसळ अंधांतरी सोडून पतीजवळ गेली तो तिने सोडून दिलेले मुसळ तसेच राहिले" तो चमत्कार पाहून तिच्या शेजारणीने तिचे अनुकरण केले. असता मुसळ कपाळात पडून रक्त वाहू लागले. आणि मी नव-याला शिव्या देऊ लागली. अशा पध्दतीचा विनोद या लावणीत स्पष्ट केला आहे.

अशा पध्दतीने परशरामाच्या विनोदी लावण्यातून समाजातील दोष दाखवून दिले आहेत. हे दोष विनोदाच्या माध्यमातून लोकांसमोर मांडले आहेत.

४) हिंदी लावण्या :

मराठी शाहिरी वाङ्मयातील सर्वच शाहिरानी हिंदी भाषेत लावण्या रचल्या आहेत. रामजोशी सारखा शाहीर हिंदी बरोबर संस्कृत कन्नड, मराठी, हिंदी अशा चार भाषेत लावण्या लिहितो. होनाजीबाळा प्रभाकर, ज्ञानभाऊ, यानीही हिंदी लावण्या रेखाटल्या आहेत. हिंदी लावण्या शाहिरामी कमी प्रमाणात रचल्या आहेत. हिंदी लावण्या या तत्कालीन परिस्थितीनुसार रचल्या गेल्या असाव्यात. परशरामाच्या एकंदर चार हिंदी लावण्या "शाहीर वरदी परशराम" या पुस्तकात डॉ. ग.ना. मोरजे यांनी दिल्या आहेत.

त्याच्या "आगडभं भोला सांब" या लावणीमध्ये परशरामानी शंकराची स्तुती केली आहे. शंकराला विविध उपमा या लावणीमध्ये वापरल्या आहेत. शंकराच्या गळ्याबद्दल वर्णन करताना परशराम म्हणतात,

"जद समेंदिर मंथन किया जद चौदा रतनमो विस निकला ।
सप्त पाताल जद जलन लगे जपीतपोक्या गया अकला ।
सिवशंकरने बीस लियानब देवदानोक्या रव्या सोकला ।
सिसके चंदन हरके खातर सपेत चंदनका टिकला ।
पंचमुखोसें अग्नी निकला येत नयनोमें छुपा रहया । "

(आगडभं भोला सांब ... पा.नं. २६६)

परशरामानी दुसरी हिंदी भाषेतील लावणी म्हणजे "घर दूर पिउका" या लावणीमध्ये शृंगाराचे वर्णन चित्रित केले आहे. या लावणीतील विरहणीचे मनोव्यवस्था परशराम उत्कृष्टरीत्या चित्रित करीत आहे.

"घर दूर पिउका कबी पोचुंगी सखी ।
नहि जहान भरनमो मेरे सरिखी दुःखी ।
कोही सखी साथ जलदीसे बरी जाऊं ।
पोशाख जरीका सपेत करके लाऊं ।
मैं लेऊंगी फेरी आलककी एक सिवलक् ।
होनेकी हो मयी जो भालोमे लिखी ।"

(घर दूर पिउका ... पा.नं. २६७)

"सुनो राधा प्यारी किने बजावी" या लावणीत राधा कृष्णाचे वर्णन केले आहे. कृष्णाच्या बासरीने व्याकुळ झालेल्या राधेचे थोडक्यात चित्र चित्रित केले आहे. या लावणीतील राधा म्हणाते,

"सुनो राधा प्यारी किने बजावी मुरली ।
राधाकिने बजायी मुरली ।

जमुनाके नीर तिर धेनु चरावे । नर बालकी गिरीधारी ।
वृंदावनको श्याम कन्हैया । धुंडके गोकुळ नगरी ।
किन्ने बजायी मुरली ।"

(सुनो राधा प्यारी... पा.नं. २५८)

शाहीर परशरामानी "नयन चोर इस तनमो जी" या लावणीमध्ये एक प्रीतीची प्यास लागलेली नायिका रंगविली आहे. नुकतीच वयात आलेली स्त्री व ती स्त्री प्रेमासाठी आसुसलेली आहे. ही प्रिया आपल्या प्रियकरला म्हणाते,

"जी के जिकार पिया तुम बिगार मुने चैन पडेना जरा ।
मेरे खातर हाल तुमारें साच वक्तका साच हिरा ।
ले गया महेल अंदर रंकिम ओ दिलका दिलभर प्यारा ।
सारी रात सुख लिया चैन नही ज्या बादल बरसे गेन्हा ।"

(नयन चोर इस तनमो जी... पा.नं.२५९)

अशा पध्दतीने या चार हिंदी लावण्यामधून शृंगार, शंकराची स्तुती इत्यादी वर्णने केली आहेत. ती महत्वपूर्ण ठरली आहेत.

शाहीर परशरामाच्या डॉ. गं.ना. मोरजे यानी या हिंदी लावण्या मराठी मिश्रित आहेत. असे विधान केले आहे. पण परशरामाच्या ज्या चार लावण्या दिल्या आहेत त्यामध्ये मराठी शब्द सापडत नाही. त्यानी हे विधान इतर लावण्याच्या आधारे केले असावे. हिंदी लावण्याचा शब्दाचा अर्थ लावणे कठिण जाते. हिंदी मध्ये लावणीची रचना जरी केली असली तरी तीचा आशय व मांडणी मराठी भाषेसारखी आहे.

अशा पध्दतीने परशरामाच्या पाच प्रमुख प्रकारात लावण्याचे वर्गीकरण केल्यानंतर इतर त्यानी काही लावण्या लिहिल्या आहेत. त्या इतर लावण्यामध्ये चित्रित केल्या आहेत.

पोवाडे :

पोवाडे आणि लावण्या ही शाहिरी कवितेची दोन अंगे आहेत. पोवाडे म्हणजे वीरांच्या पराक्रमाचे विद्वानांच्या बुध्दीमत्तेचे, सामर्थ्याचे, गुण कौशल्याचे काव्यात्मक वर्णन किंवा स्तुती होय" अशी पोवाडयाची व्याख्या प्रो. नसिराबादकर करतात तर श्री. म.ना. सहस्त्रबुध्दे यांनी पोवाडयास "कीर्तिकाव्य" संबोधिले आहे. काही संशोधकाच्या मते गोंधळा-तून पोवाडा हा प्रकार पुढे विकसीत झाला असावा असे मत मांडतात.

मराठेशाहीमध्ये या वाङ्मयप्रकारास तत्कालीन परिस्थितीमुळे अधिक उत्तेजन व प्रेरणा मिळाली. ब्राम्हणाना पदरी ठेवण्याची प्रथा फार पूर्वीपासून आपणाकडे चालत आली आहे. ते कार्य मराठेशाहीमध्ये शाहिरानी केले आहे. शाहीर लोकजीवनाशी एकरूप झाले होते. त्यानी मराठ्यांच्या सामुदायिक भावजिवनाचे चित्र मांडले आहे. पोवाडयातून वीररसाचा आविष्कार होतो.

प्राचीन मराठीतील आज सुमारे तीनशे पोवाडे उपलब्ध आहेत. त्यापैकी शिवकालातील चार, शाहूकालातील तीन व पेशवेकालातील दीडशे आहेत. उरलेले अव्वल इंग्रजी अमदानातील आहेत. प्रमुख शाहिरांच्यामधील प्रभाकर आणि परशराम हे शाहीर इंग्रजी अमदानीपर्यंत जिवंत होते. आपण शाहीर परशरामाच्या लावण्यांचा अभ्यास केला आहे. परशरामाच्या लावण्याबरोबरच त्याचे पोवाडे ही महत्वपूर्ण ठरले आहेत. त्याच्या पोवाडयाची माहिती पाहू.

डॉ. गं.मा. मोरजे यानी संपादित केलेल्या "शाहीर वरदी परशराम" या ग्रंथामध्ये त्याचे एकूण आठ पोवाडे चित्रित केले आहेत. त्याच्या इतर पोवाडयाची माहिती दिली आहे पण ते पोवाडे या संग्रहात उपलब्ध केलेले नाहीत.

शाहीर परशरामाच्या संग्रहातील आठ पोवाडयापैकी चार पोवाडे तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे वर्णन करतात. चार पोवाडे ऐतिहासिक

व्यक्तिवर्णनपर आहेत. शाहीर परशाराम हा पेशव्यांच्या अस्त व इंग्रजांच्या उदयाकाळचा कवी होता. त्यांच्या पोवाडयातून मराठेशाही जाऊन इंग्रजी अमल सुरु झाल्यामुळे जो सामाजिक बदल घडत होता त्याचे वर्णन केले आहे.

शाहीर परशारामाची "आंधार नगरी बेबंद राजा" या लावणीवजा पोवाडयात पेशवेकालीन जे राजेरजवाडे अंधाधुंदीचा कारभार करीत होते त्याचे वर्णन केले आहे . हे अंधाधुंदीचे चित्र परशाराम मार्मिकतेने चित्रित करतात. कोणत्याही काळाला लागू पडणारे हे चित्र आहे. एका माळ्याच्या कथेतून अंधाधुंदीचे चित्र परशाराम रेखाटतात. या पोवाडयाचे कथानक असे - एक माळी भोपळे विकायला घेऊन येतो. भोपळे विकायला बसल्यानंतर सरकारी अधिकारी देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी यांनी त्याचा एक एक भोपळा न विचारता उचलून नेला. शेवटी कोतवालाने त्यात रेडाही हुसकावून नेला. अंधारनगरीत तो दाद फिर्याद कुणाकडे नेणार ? राजाकडे तक्रार केली त्याने मारून पिटून आकलून लावले. शेवटी माळी शहाणपणा शिकला व त्याने समाजाला कसे फसवले हे परशाराम उत्कृष्टरित्या सांगतात,

"बेशाक चोपवा करून त्यावर शिक्का सरकारी ।
हर जिन्नस भरभरून नेता कोणीच न वारी ।
बारा वर्षे शहर लुटले धूम केली सारी ।
मग राजाची भेट घेतली करून सही स्वारी ।
विठ्ठल नामी परशाराम म्हणे ओळख भोपळयाची ।
ठाके ठोक ठगाई करून जो राहील पत त्याची ।"

(आंधार नगरी बेबंदराजा ... पा.नं. २५४)

त्यांच्या "संकट मोठे युगात आलास वाटे" या पोवाडयामध्ये सर्व-सामान्य माणसाला वाटणाऱ्या गोष्टीचे चित्रण केले आहे. त्यामध्ये ते

सांगतात, लोक सत्कर्माचे भान विसरले आहेत, देवतांच्या जत्रा कमी व्हायला लागल्या आहेत. पूर्वीचे राजे पराक्रम हीन झाले आहेत. पूर्वीचे सरदार दीनवाणे होऊन राहत आहेत. युध्दासाठी वापरले जाणारे हत्ती, उंट, भुसार माल वहाण्याच्या कामी लावले गेले आहेत. ब्राम्हण कीतीभ्रष्ट झालेले आहेत, पतिव्रतांची प्रतिष्ठा कमी झाली आहे. बायकानी आपल्या नव-याना मांजरासारखे वागवायला सुरवात केली आहे, मुलगा बापाला मारायला लागला आहे, बायकोपेक्षा त्याच्या मेहुणीची थाट मोठा आहे. कथा कीर्तनाची गोडी कमी झाली, उखाण्याना महत्व आले आहे. कमी प्रतीच्या कलावंताना मान मिळत आहे. संन्याशी, बैरागी याचे प्रमाण वाढले आहे. अशा अनेक समस्या समाजासमोर उभ्या आहेत. या समस्या पालविण्यासाठी परशरामानी सुचवलेला उपाय महत्वाचा आहे.

"जपी तपी संन्याशाचे भार । गोसावी बैरागी अपार ।
जे कां तपतीर्थ करणार । पराक्रमावर बांधती परदार ।
संत झाले चोखेमेळे फार । टिळाटोपी माळांचे भार ।
करु पाहती एककार । जार जारणी जारणी जार ।
निराशा अंतरीं निर्धार । त्याशीं एकनाम सार ।
नामी विठ्ठल पाई घालून भार । परशाराम येथु म्हणे तार ।
येऊनिया नेटें संकट मोठें । युगांत आलासा वाटे ।"

(संकट मोठें युगांत ... पा.नं. २६३)

"शाककर्ता अवतार" या पोवाड्यामध्ये परशारामानी इंग्रजी राज्य म्हणजे, "शाककर्ता अवतार" होय. इंग्रजी राज्य म्हणजे तप, तेजाच्या सुर्याचा उदय, असून त्याच्या तेजापुढे पृथ्वीवरील पराक्रमरहीत राजे करपून गेले आहेत. मोगल, भोसले, पेशवे याना इंग्रजानी निपटून काढले आहे. इंग्रज सरकारच्या भीतीने त्यांच्याशी न लढताच राजानी आपले महाल, किल्ले,

त्याना देऊन टाकले. आपण आईच्या उदरात अन्नाला आलो याचे भानही त्यांना राहिले नाही. वाघाला पाहून थरथरते तशी हिंदुस्थानातील प्रजा थरथरते. इंग्रजाना अवगत असलेले शास्त्रीय ज्ञान पाहून परशाराम म्हणाता -

"नाही विलायत कोणी पाहिली या मुलखावर जरब कशी ।
एक चपराशी चकती पाहून सत थरथरीत बकरी जशी ।
कला कुशलता हीकमती जाणतो ईश्वर कळेना कळ ऐशी ।
दहा हत्तीशीं काम ठळेना एक माणूस लावी त्याशीं ।
न्यायनीति बालाहून बरीक मुसळाहून ठोसर लईशी ।
शास्त्र नाही देहदंड करावा खून केल्या ना चुके फाशी ।
अतिरति (थी) एका दोरींत ओविले फळझाडे अंबा गद्रा ।
जणू जोशी भाकून गेले तें रोकड पडलें प्रद्रा ।"
(शाककर्ता अवतार कलीमधें... पा.नं. २६२)

सर्वसाधारण पणे दहा माणसानी करावयाचे काम त्यांचा एक माणूस करतो. इंग्रजाची न्यायनिती कडक आहे. एखाद्याने खून केल्यास त्याची फाशीची शिक्षा चुकत नाही. या राज्यात सर्वांना नियम समान आहेत. परशारामाची जी देववादी भाविक दृष्टी आहे ती येथे जाणवते.

"कुलागुणी जे कुपिण त्यानें तप आचरण केल्या तस्ता।
तेजहीन अवघ्याचें झाले शूर शिपाई कांहीं नसतां ।
छत्तीस कारखानें घरींच करितों इतरांचो ना घरी अस्ता ।
तराजूंत तोलून काढिल्या पृथ्वीतील अमोल वस्ता ।
लक्ष्मीला मूळ आलें वाटतें समुद्रांत जाईल दिसतां ।
नामीं विठ्ठल परशाराम म्हणे उघट दिसे धोपट रस्ता ।
चतुर सभा तुम्ही गुणीजन सज्जन हरि भजनीं तरी दिस गुजरा ।
हीच विनंती ब्राम्हणाक्षेत्री वंश्य करून त्या अतिशूद्रा ।
जन भय निर्भय नाही... ।" २६३.
(शाककर्ता अवतार ... २६३)

शाहीर परशरामानी समाजस्थितीवर ज्याप्रमाणे पोवाडे रचले त्याप्रमाणे त्यानी ऐतिहासिक व्यक्तींच्यावर पोवाडे चित्रित केले आहेत. "व्हावे दर्शन अशी अशा" या पोवाड्यात खंडेराव महाराजांचे चित्रण केले आहे. खंडेराव महाराजांचे चित्रण करताना ते म्हणतात,

"व्हावें दर्शन अशी आशा करुन आलों मोठी ।
खंडेराव महाराज पहावे दृष्टी । व्हावे दर्शन ।
कडेकोट शहर लखलखाट द्वारका जैशी ।
मधे मुख्य महाल प्रभुचा उंच आकाशी ।
एक छत्री राज्य महाराज ईश्वरे जैसी ।"

(व्हावे दर्शन अशी आशा... पा.नं.२८४)

या लावणीमधुन परशरामानी खंडेराव महाराजांची स्तुती केली आहे.

"वाहवा हो राव मल्हार कन्हया"। या पोवाड्यात मल्हारराव होळकरांच्या किर्तीचे वर्णन केले आहे. त्यानी चारी बाजुला मिळवलेल्या किर्तीचे वर्णन केले आहे, त्याचबरोबर या लावणीत कुंभेरीची लढाई, अहिल्याबाईचे कार्य, लाख्या बारगीर असे महत्वपूर्ण ऐतिहासिक उल्लेख येतात.

शाहीर परशरामानी इंग्रजांचे राज्य, त्यांची शासन व्यवस्था पाहिली होती त्याचे चित्रण पोवाडयातुन केले आहे. परशरामानी पोवाडयातुन समाजस्थितीचे वर्णन वास्तववादी व महत्वपूर्णरित्या केले आहे. इंग्रजी सत्ता आल्यावर त्यांचे वर्णन करणारा परशराम हा एकमेव लावणीकार होता. परशरामाने समाजाचे निरिक्षण इतर शाहिरांच्यापेक्षा अधिकतर सुक्ष्म होते. इंग्रज राजवट त्याने पाहिली होती. त्याचे होणारे परिणाम तो अनुभवित होता. सर्वसामान्य माणसाला आवश्यक असणाऱ्या गोष्टी परशरामानी पोवाडयातुन दिल्या आहेत.

## प्रकरण चौथे

### संदर्भ ग्रंथ


१) जोग रा.श्री. - मराठी वाङ्.मयाभिरुचीचे विहंगमावलोकन, पृ.१६८.

२) डॉ. मोरजे गं.ना. - शाहीर वरदी परशाराम, पृ. ४३.

३) डॉ. चव्हाण शिवाजीराव - मराठी आध्यात्मिक शाहिरी परंपरा व वाङ्.मय, (प्रबंध शिवाजी विद्यापीठ), पृ. १६.

४) डॉ. गायकवाड मि.जि. - मराठी लावणी निर्मिती व स्वरूप, पृ. ५६.

५) डॉ. मोरजे गं.ना. - शाहीर वरदी परशाराम, पृ. ४८/४९.

६) तत्रैव, पृ. ३२.


......